- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६१ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मुंबईतील ६० पर्यटक नेपाळमधील इमारतीत दबले गेल्याची भीती



**वृत्तसंस्था, मुंबई**
नेपाळच्या कैलास मानसरोवर फिरण्यासाठी गेलेले मुंबईतील ६० पर्यटकांचा चिखल, माती आणि ढिगाऱ्याखाली फसून मृत्यू झाला असल्याची शंका नेपाळ सरकारला आहे. अंधेरीतील डॉक्टर मिलिंद चितळे यांच्या हिल अँड ट्रॅकिंग कंपनीच्या माध्यमातून हे ६० पर्यटक नेपाळमध्ये कैलास मानसरोवर फिरण्यासाठी गेले होते. मात्र, सकाळी साडेआठ वाजता नेपाळ-चीन बॉर्डरवर असलेल्या कस्टम आणि इमिग्रेशन इमारतीजवळ ते सर्व पर्यटक पोहोचल्यावर ही महाप्रलयाची दुर्दैवी दुर्घटना घडली.

यावेळी डोंगराचा मोठ्या प्रमाणात ढिगारा, चिखल आणि माती इमारतीवर पडल्यामुळे हे सर्व पर्यटक ४० ते ५० फूट खाली दबले गेल्याची शंका व्यक्त होत आहे.

नेपाळ सरकारकडून आता या

## ४० ते ५० फूट खाली दबले गेल्याची शंका

पर्यटकांच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली आहे की, नेपाळ सरकार सध्या घटनास्थळी पोहोचू शकत नाही. नेपाळ-चीन सीमेजवळ घडलेल्या दुर्घटनेमुळे ९० किलोमीटर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल, माती आणि दगडांचा ढिगारा असल्यामुळे पर्यटकांना शोधण्यात मोठी अडचण होत आहे. त्या इमारतीजवळ फक्त हेलिकॉप्टरने सर्च ऑपरेशन करता येते. मात्र, तो एवढा मोठा ढिगारा असल्यामुळे त्याला साईडला करता येत नसल्याची मोठी अडचण नेपाळ सरकारसमोर निर्माण झाली आहे.

नेपाळ सरकारकडून या भारतीय पर्यटकांच्या कुटुंबियांना १८४ दिवस म्हणजेच सहा महिने थांबण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअगोदर भारतामध्ये लोकल पोलीस स्टेशनमध्ये पर्यटक हरवल्याच्या तक्रारी नोंदवायच्या सूचना देखील नेपाळ सरकारकडून भारतीय दुतावासाला देण्यात आल्या आहेत. नेपाळ सरकारच्या सूचना ऐकल्यानंतर या पर्यटकांच्या कुटुंबासमोर मोठा दुःखाच्या डोंगर कोसळला आहे.

दरम्यान, ज्या ठिकाणी नेपाळ आणि चीन सीमेवर इमिग्रेशन आणि कस्टमच्या इमारती आहेत, त्यावर मोठ्या प्रमाणात डोंगराचा भाग आणि माती चिखल आल्यामुळे इमारत दबली गेली आहे, हे सर्व पर्यटक ४० ते ५० फूट खाली दबले गेले आहेत, अशी माहिती देण्यात येत आहे. येथील ९० किलोमीटर रस्ता चिखलामध्ये असल्यामुळे त्या ठिकाणी पोहोचण्यास अशक्यप्राय बाब आहे. मोठ्या प्रमाणात चिखल असल्यामुळे त्याला बाजूला काढणे शक्य होणार नसल्याचं नेपाळ सरकारचं मत आहे.

### भारताची मदत घेण्यास नेपाळ तयार

या कठीण काळात भीषण पूर आणि विध्वंसाचा सामना करणाऱ्या नेपाळला भारत सातत्याने सर्वतोपरी मदत करत आहे. नेपाळसाठी ११ टन मदत साहित्य घेऊन जाणारे चौथे भारतीय विमान काठमांडूला पोहोचले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी एका एक्स-पोस्टमध्ये ही माहिती दिली आहे. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की या कठीण काळात भारत नेपाळच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. नेपाळमध्ये विनाशकारी पुराच्या पार्श्वभूमीवर शोध आणि बचाव कायासाठी आधी परदेशी मदतीचे प्रस्ताव नाकारले होते. पण आता त्यांनी आपला निर्णय बदलला आहे. काठमांडू पोस्टनुसार, या विनाशकारी आपत्तीत ज्या देशांचे नागरिक अजूनही बेपत्ता आहेत, त्यांच्या दबावाखाली नेपाळने हा निर्णय घेतला आहे. रॉयटर्स या वृत्तसंस्थेनुसार, नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते यांनी शुक्रवारी सांगितले, मदतीचे प्रस्ताव येणे स्वाभाविक आहे. आमच्या सुरक्षा यंत्रणा शोध आणि बचाव कार्य करत आहेत. आम्हाला सध्या अशा मदतीची गरज नाही. भोटेकोशी नदीच्या पुरामुळे बाधित झालेल्या भागांतील शोध आणि बचाव कार्यासाठी नेपाळ आता आंतरराष्ट्रीय शोध आणि बचाव पथकांची मदत स्वीकारण्यास तयार आहे.

### अडकलेल्या पर्यटकांसाठी शिवसेना मदत कक्ष

नेपाळ महापुराच्या पार्श्वभूमीवर शिवसेना मदत कक्ष सक्रिय झाला असून, शिवसेना सोशल मिडिया राज्यप्रमुख राहुल कनाल यांच्या नेतृत्वात काठमांडू येथे गेल्या ५ दिवसांपासून शिवसेना मदत कक्षाच्या माध्यमातून अविरतपणे मदतकार्य सुरू आहे. या मदत कक्षाच्या माध्यमातून नेपाळमध्ये अडकलेल्या ११ विद्यार्थ्यांना सुखरूपरित्या पुण्यात आणण्यात आले. तर कैलास मानसरोवर येथे गेलेल्या ३७ भाविकांना देखील मुंबईत सुखरूप पोहोचविण्यात आले. तसेच नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील आणखी १४० भाविकांशी संपर्क झाला असून, लवकरच त्यांना मुंबईला रवाना करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

थोडक्यात


## कळव्यात बुडून तिघांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, मुंबई**
जिल्ह्याच्या कळवा खाडी, रेतीबंदर गणेश घाट याठिकाणीही तीन मुले बुडाल्याची दुर्घटना घडली, दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या तीन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत्यू झालेले तीनही तरुण हे मुंब्र्यातील रहिवाशी असल्याची माहिती मिळत आहे. मुंब्र्यातील ठाकूर पाडा इथं हे तरुण राहत होते. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते.

## पूर्वांचलमध्ये स्वाइन फ्लूचा शिरकाव

**आझमगड** : पूर्वांचलच्या वाराणसी, आझमगड आणि मिझार्पूर विभागांतील विविध जिल्ह्यांमध्ये स्वाइन फ्लूने डोके वर केले आहे. या आजाराने १८ सक्रिय रुग्णांची नोंद झाल्याने आरोग्य विभाग पूर्णपणे सतर्क झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वाराणसीचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. एन. पी. सिंग यांनी जिल्हास्तरीय रुग्णालयांसह सर्व सामुदायिक आरोग्य केंद्रांमध्ये खाटा राखीव ठेवण्याचे आणि आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध ठेवण्याचे कडक निर्देश दिले आहेत. तसेच सर्व संबंधित अधिकाऱ्यांना रोग निगराणी वाढवून संशयित रुग्णांची माहिती तात्काळ सरकारी पोर्टलवर नोंदवण्यास सांगितले आहे. सध्या आढळलेल्या १८ रुग्णांपैकी सर्वाधिक ४ रुग्ण वाराणसीमध्ये आहेत.

# २७० लोकांना घेऊन जाणारी बोट अचानक उलटली, बचावकार्य सुरू





**वृत्तसंस्था, तुर्की**
आज दुपारी उत्तर सायप्रसच्या किनाऱ्याजवळ धक्कादायक घटना घडली आहे. किनाऱ्यावरुन निघाल्यानंतर थोड्याच वेळात २७० लोकांना घेऊन जाणारी एक प्रवासी फेरी बोट उलटली आहे. तुर्की सायप्रसच्या माध्यमांचा हवाला देत ही बातमी देण्यात आली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, यात जीवितहानी झाली आहे की नाही याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. परंतू, बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

कॅटामरान-शैलीची फेरी सायप्रसच्या वांशिकदृष्ट्या विभागलेल्या उत्तर भागात असलेल्या किरेनिया बंदरातून, मेर्सिन प्रांतातील ताशुकचू या तुर्की बंदराकडे प्रवास करत होती. यावेळी किनाऱ्यापासून बोट सुमारे चार मैल अंतरावर गेल्यावर पाणी भरु लागले. त्यानंतर बोट उलटली आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आहेत. तात्काळ बचावकार्य देखील सुरु करण्यात आलं आहे. तुर्कीच्या उत्तर सायप्रसच्या आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, आरोग्य सेवांकडून जलद प्रतिसादासाठी सर्व आवश्यक तयारी केली जात आहे.

# देवेंद्र फडणवीस लोकांचे नव्हे, तर बिल्डरांचे नेते : संजय राऊत



**वृत्तसंस्था, मुंबई**
शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार निशाणा साधला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांनी केलेल्या एका ट्विटबाबत विचारले असता, त्यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करत देवेंद्र फडणवीसांना खोचक टोला लगावला आहे.

माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, आपण ट्विटद्वारे जे विचारले आहे ते अगदी खरे असून देवेंद्र फडणवीस यांना ईडी आणि इतर तपास यंत्रणांशी संबंधित गोष्टींची अधिक माहिती असते. मुंबई आणि महाराष्ट्रातील सर्व बिल्डर त्यांना चांगले माहित आहेत. फडणवीस हे सर्वसामान्य जनतेचे नेते नसून, केवळ उद्योगपती आणि बिल्डरांचेच नेते असल्याचा घणाघाती आरोपही संजय राऊत यांनी केला. पुढे ते म्हणाले की, सध्या कोणता बिल्डर अडचणीत आहे किंवा कोणावर काय संकट आले आहे, याची खडान्खडा माहिती देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच असू शकते. त्यामुळे त्यांनी ही माहिती स्वतःपुरती सीमित न ठेवता सर्वसामान्य जनतेलाही उपलब्ध करून द्यावी, असा खोचक सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आयोजित फेथ लिडर्स कॉन्फरन्समध्ये एक विधान केले होते. भारतात एकही मुसलमान नको असे म्हणणारा व्यक्ती हिंदू असूच शकत नाही, कारण आपल्या डीएनएमध्येच एकता आणि विविधता समाविष्ट आहे त्यांच्या या वक्तव्यावर टीका करताना संजय राऊत म्हणाले की भागवत यांनी ही विधाने अमेरिकेत जाऊन करण्यापेक्षा भारतात, दिल्लीत आणि नागपुरात राहून करायला हवीत. भारतात एक भूमिका घ्यायची आणि परदेशात जाऊन दुसरीच विधाने करायची, हा दुटप्पीपणा असून ते निव्वळ ढोंग आहे.

आपल्या हिंदू धर्मात अशा प्रकारच्या ढोंगाला अजिबात स्थान नाही. या देशामध्ये राष्ट्रीय एकात्मता अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे जे लोक देशात विद्वेषाचे राजकारण करत आहेत, त्यांच्या पाठीशी संघ उभा राहणार नाही, अशी स्पष्ट भूमिका सरसंघचालकांनी घेतली पाहिजे. तसेच, जे लोक संघातून आलेले स्वयंसेवक आहेत आणि सध्या सरकारमध्ये बसून असे राजकारण करत आहेत त्यांना सत्तेतून बाहेर काढण्याची मोहीम राबवू, अशा प्रकारची भूमिका सरसंघचालकांनी घेतली पाहिजे असेही संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

# नागपुर लौटे नेपाल में फंसे १०० नागरिक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**
नेपाल में आई भीषण बाढ़ के कारण काठमांडू में फंसे उपराजधानी नागपुर के १०० नागरिक आखिरकार सुरक्षित अपने शहर पहुंच गए। पटना-पुर्णा एक्सप्रेस से सभी यात्री तड़के नागपुर रेलवे स्टेशन पहुंचे, जहां उनके परिजनों और बड़ी संख्या में नागरिकों ने उनका स्वागत किया। सुरक्षित वापसी के बाद यात्रियों के चेहरे पर खुशी नजर आई। सभी ने सकुशल वापसी के लिए मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और प्रशासन का आभार जताया।

ज्ञात हो कि, नेपाल में २६ अगस्त को नेपाल-तिब्बत सीमा से लगे रसुवा जिले में भोटेकोशी नदी में अचानक आई भीषण बाढ़ ने भारी तबाही मचाई। तेज बहाव के कारण कई इलाकों में सड़कें, पुल, मकान और अन्य बुनियादी ढांचे को नुकसान पहुंचा। बाढ़ का असर भोटेकोशी और त्रिशूली नदी के बहाव के साथ आगे के क्षेत्रों तक पहुंचा। रसुवा के अलावा नुवाकोट, धादिंग और गोरखा जिले भी प्रभावित हुए।



नदी किनारे रहने वाले लोगों के साथ बड़ी संख्या में भारतीय पर्यटक और कैलाश मानसरोवर यात्रा पर गए श्रद्धालु भी इस आपदा के चलते नेपाल के अलग-अलग हिस्सों में फंस गए। उपराजधानी नागपुर से १०६ श्रद्धालु शिव महापुराण कथा के लिए काठमांडू गए हुए थे। हालांकि, नेपाल में आई बाढ़ के कारण सभी श्रद्धालु नेपाल-भारत सीमा में फंस गए। बाढ़ की स्थिति और नागरिकों की सुरक्षा को देखते हुए नागपुर में मौजूद परिजनों में चिंता बढ़ा गई ,सभी ने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहित सरकार से सभी की सुरक्षित वापसी की गुहार लगाई। मामले की गंभीरता को देखते हुए मुख्यमंत्री ने भारत सरकार के साथ मिलकर सभी के सुरक्षित वापसी के प्रयास शुरू किए। बाढ़ के दूसरे दिन सभी यात्री सुरक्षित बिहार के सीतामढ़ी पहुंच गए।

बिहार सरकार ने सभी यात्रियों रहने और खाने की व्यवस्था की। इस दौरान सभी को सुरक्षित पटना पहुंचाने और वहां से नागपुर जाने की व्यवस्था की। मुख्यमंत्री फडणवीस सहित राज्य प्रशासन लगातार नागरिकों से संपर्क में बना रहा। भारतीय सिमा में पहुंचने के बाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने सभी नागरिकों से स्वयं बात की और सभी को सुरक्षित नागपुर पहुंचाने का भरोसा दिलाया।

भारतीय सिमा में पहुंचने के बाद महाराष्ट्र सरकार ने बिहार सरकार के साथ मिलकर सभी के रहने और खाने की व्यवस्था की। इस दौरान पटना से नागपुर जाने के लिए पटना-पूरना एक्सप्रेस में सभी नागरिकों की टिकट करवाई गई। शनिवार सुबह साढ़े ७.३० बजे १०० श्रद्धालु पटना जंक्शन से नागपुर के लिए रवाना हुए। वहीं उसके पहले चार यात्री वाया दिल्ली होते हुए नागपुर पहुंचे थे। रविवार तड़के साढ़े चार बजे सभी यात्री सुरक्षित नागपुर पहुंच गए। जहां रेलवे स्टेशन पर भारतीय जनता पार्टी नागपुर शहर के अध्यक्ष दयाशंकर तिवारी सहित नागरिकों के परिजनों ने उनका स्वागत किया।

सुरक्षित घर वापसी के बाद सभी नागरिकों के चेहरों पर खुशी साफ नजर आई। इस दौरान यात्रियों ने उनकी सकुशल वापसी के लिए मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बिहार सरकार और स्थानीय प्रशासन का आभार जताया। यात्रियों ने बताया कि नेपाल में आई आपदा के कारण वे सभी काफी डर गए थे, लेकिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहित प्रशासन लगातार उनके संपर्क में रहा और उनकी सुरक्षित वापसी के लिए प्रयास करता रहा। आज जब वे सभी सकुशल घर पहुंच गए हैं, तो उन्होंने मुख्यमंत्री का विशेष रूप से आभार व्यक्त किया। साथ ही, बिहार सरकार और स्थानीय प्रशासन की ओर से की गई व्यवस्थाओं के लिए भी यात्रियों ने धन्यवाद दिया।

# नागपुरात हिट अँड रनचा थरार! भरधाव कारने ज्येष्ठ नागरिकाला चिरडले

## जापानी गार्डन भागातील घटना, आरोपी कारचालक अटकेत



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरमध्ये हिट अँड रनची घटना घडली आहे. कैलास सोनदीया हे आज पहाटे ६ वाजता जपानी गार्डन परिसरात मॉर्निंग वॉक करता असतांना एका भरधाव इनोव्हा कारने त्यांना अक्षरशः उडवले आहे. यात गंभीररित्या जखमी झाल्याने यात कैलास यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार तीन तरुण रेस करत असतांना कारने त्यांना उडवले, घटनेनंतर कार चालक पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले व आरोपीला ताब्यात घेतले. मात्र या घटनेनं शहरात एकच खळबळ उडाली असून टवाळखोरांच्या हुल्लडबाजी मुळे आणखी एक नाहक बळी गेल्याने नागरिकांमधून रोष व्यक्त केला जात आहे. तर दुसरीकडे आता रस्त्यावरून चालणं देखील असुरक्षित वाटू लागल्याची भावना या घटनेनंतर नागरिकांनी वक्त केली आहे.

या घटनेनंतर घटनास्थळी नागरिकांनी रोष व्यक्त केला. मागील काही दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या अपराधीक घटना पोलिस विभागापुढे आव्हान बनून उभे आहे. अपघात, चोरी, हत्या अशा घटनांनी नागरिक दहशतीत आहे.पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी घटनास्थळी भेट देत माहिती जाणून घेतली. या घटनेनंतर आरोपी कार चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास पोलिस करीत आहे.

संपादकीय लेखणीतून...

# एक जाज्वल्य दत्तावतार

एक जाज्वल्य दत्तावतार म्हणजे सन १८५४ ते १९१४ ह्या काळात होऊन गेलेले परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज होय. श्रीक्षेत्र माणगाव येथे श्री हरिभट टेंबे या दत्तोपासकाचे वास्तव्य होते. त्यांचे थोरले चिरंजीव श्री. गणेशपंत टेंबे हे मुळचेच विरक्त होते. वडिलांच्या दत्तभक्तीचा वारसा श्री. गणेशपंतांनी उचलला होता. ते दररोज श्री दत्तपादुकांची पूजा व श्रीगुरुचरित्राचे वाचन करीत असत. श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या आशीवार्दाने श्रावण शुद्ध षष्ठीला श्रीदत्तरूपाने श्री गणेशपंत टेंब्यांच्या घरी अवतार घेतला. नवजात बालकाचं बाराव्या दिवशी थाटात बारसं झालं आणि बाळाचं नाव वासुदेव ठेवण्यात आलं. बालपणापासूनच प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि तेजस्वी वाणी असणाऱ्या वासुदेवाची छाप कोणावरही चटकन पडत असे. लहानपणीच वेद मुखोद्गत करून सर्व शास्त्रांचं अध्ययन त्यांनी केलं होतं. वयाच्या बाराव्या वर्षी दशग्रंथी ब्राह्मण म्हणून ते प्रसिद्ध झाले.

श्रीवासुदेव शास्त्रीबुवांचा विवाह त्यांच्या वयाच्या २१व्या वर्षी श्रीबाबाजीपंत गोडे यांची कन्या अन्नपूणाबाईशी झाला व तद्नंतर त्यांनी स्मातार्गी उपासना सुरू केली. त्या सोबत श्रीगायत्री पुरश्चरण आणि ज्योतिषाचा अभ्यास चालू होताच. वडिलोपार्जित दत्तभक्तीचा वारसा श्रीवासुदेव शास्त्रीबुवांकडे आला होताच. अखंड वेदाध्ययन, वैयक्तिक साधना आणि त्यासोबत पीडितांना मार्गदर्शन यांची त्याला मिळालेली जोड, यामुळे ते लहान वयातच उच्च आध्यात्मिक अनुभवाचे अधिकारी बनले. परिणामस्वरूप त्यांना स्वप्नदृष्टांतासह श्रीदेवांची- भगवान श्रीदत्तात्रेय वाणी ऐकू येत असे. संत नामदेवांबरोबर ज्याप्रमाणे श्रीविठ्ठल बोलत असे, त्याप्रमाणे भगवान श्रीदत्तात्रेय त्यांच्याशी संवाद साधत असत. त्यांचं संपूर्ण जीवन त्या पथप्रदर्शक श्रीदेववाणीच्या प्रकाशातच व्यतीत झालं, एवढंच नव्हे तर त्यांच्या संपर्कात जे जे आले, त्या त्या सर्वांचं जीवन त्यांनी त्या वाणीसामर्थ्याद्वारे उजळून टाकलं.

कोकणातील माणगाव येथील ही घटना आहे. एका गृहस्थाच्या घरी दुभती गाय होती. ती त्या दिवशी काही केल्या दूध काढू देईना. ती गाय लाथा झाडीत असे. त्या गृहस्थाला कुणी तरी गावातील श्री गणेशभट टेंबे यांच्या मुलाचे नाव सुचविले. त्याचे नाव वासुदेव. वासुदेवाला- श्रीमद्परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानन्द सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांना मंत्रांची माहिती होती. गाय दूध देईनाशी झाली होती, तीच्यावर मंत्रप्रयोग करण्यासाठी टेंब्यांच्या वासुदेवाला आमंत्रण देण्यात आले. वासुदेव त्या गृहस्थाच्या घरी उपस्थित झाले आणि त्यांनी त्या धिंगाणा घालणाऱ्या गायीवर मंत्रप्रयोग केला. मंत्रप्रयोग केल्यानंतर लाथा झाडणारी ती गाय अगदी शांत झाली होती; मग ती दूध काढू द्यायला तयार झाली. वासुदेव हा एकपाठी होता. एकदा वाचलेली गोष्ट त्यांची तोंडपाठ होत असे. वयाच्या बाराव्या वर्षीच त्याने ऋग्वेद संहिता, पदे, घन, इत्यादीचा अभ्यास केला होता. याच वेळी ते दशग्रंथी ह्या नावाने प्रसिद्धीस पावले. गुरुचारीत्राचा पाठ ते प्रतिदिनी वाचत असत. वयाच्या पंधराव्या वर्षापासून लोक टेंब्यांच्या वासुदेवाला शास्त्रीबुवा म्हणून संबोधू लागले. त्या वेळी उज्जैनीला जाण्यासाठी म्हणून शास्त्रीबुवा नर्मदा तीरावरच्या मंडलेश्वर ह्या गावी आलेले होते. तेथे कैवल्याश्रम स्वामी नावाचे थोर सत्पुरुष वास्तव्य करीत होते. शास्त्रीबुवांनी स्वामींची भेट घेऊन चर्चा केली. त्या वेळी स्वामींनी मी तुम्हाला दंड देतो असे सांगितले. त्यामुळे शास्त्रीबुवा उज्जैनीला न जाता मंडलेश्वरलाच राहिले. त्याच रात्री श्रीदत्त भगवान हे शास्त्रीबुवांच्या स्वप्नात गेले व त्यांना विचारू लागले की तुम्ही माझी आज्ञा उल्लंघन करणार की काय? दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर शात्रीबुवानी स्वप्नातली सारी हकिकत कैवल्याश्रम स्वामींच्या कानावर घातली. हे ऐकल्यावर स्वामींनी शास्त्रीबुवाना दंड दिला नाही.

नंतर शास्त्रीबुवा तेथून निघून उज्जैनीला येऊन पोचले. तिथल्या दत्त मंदिरात जाऊन शास्त्रीबुवांनी नारायण स्वामींची भेट घेतली व त्यांना नमस्कार करून मंडलेश्वर गावी, कैवल्याश्रम स्वामींकडे घडलेली हकिकत निवेदन केली. त्यावर नारायण स्वामी त्यांना म्हणाले, अनिरुद्धस्वामी हे माझे सद्गुरूमहाराज आहेत. त्यांनी जर जर का आज्ञा केली तर मला तुमाला दंड देता येईल. एरवी दंड देता येणार नाही. शास्त्रीबुवा अनिरुद्धास्वमींकडे गेले व त्यांना आदरपूर्वक नमस्कार करून आपली सारी हकिकत त्यांच्या कानावर घातली. तेव्हा ते म्हणाले, "फार उत्तम!" नंतर स्वामींनी नारायणस्वामींना बोलावून घेतले आणि शास्त्रीबुवाना दंड देण्याविषयी आज्ञा केली. जेष्ठ वद्य द्वितीयेच्या दिवशी शास्त्रीबुवाना दंड देण्याचा विधी झाला आणि त्यांचे नाव वासुदेवानंद सरस्वती असे ठेवण्यात आले. त्या दिवसापासून सारे लोक शास्त्रीबुवांना, वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज म्हणू लागले. त्या दिवशी वासुदेवानंदानी नारायण स्वामींबरोबर भिक्षा केली. श्री दत्तमहाराजांना ही गोष्ट पसंत पडली नाही. वासुदेवानंदांना ओकाऱ्या सुरु झाल्या. कितीही उपाय केले तरी त्या थांबत नव्हत्या. नारायण स्वामी घाबरून गेले. श्री दत्तमहाराजांची आज्ञा उल्लंघन केल्यामुळे हा सारा प्रकार झाला, असे कळताच नारायण स्वामींनी श्री दत्तमहाराजांना वंदन करून त्यांची प्रार्थना केली, "दत्तमहाराज! हा आपला शिष्य आहे व मीही आपलाच शिष्य आहे. माज्या अपराधाबद्दल मला क्षमा करा आणि ह्या आपल्या शिष्याला आपण बरं करा. ह्या पुढे आपल्या आज्ञेविरुद्ध कोणतेही कार्य यांना कधी सांगणार नाही व त्यानंतर वासुदेवानंदांच्या ओकाऱ्या थांबल्या.

नरसोबाच्या वाडीला श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे स्मृतिमंदिर आहे. नरसोबा वाडीचे दत्तस्थान हेच श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे प्रेरणास्थान होय. श्रीक्षेत्र माणगाव येथे श्रीवासुदेव शास्त्रीबुवांनी स्थापन केलेलं श्रीदत्तमंदिर, हा त्या श्रीदेववाणीचाच आज्ञारूप आविष्कार आहे. यापुढील सात वर्षे आपण माणगावमध्ये राहणार आहोत, शब्दांमध्ये श्रीदत्तात्रेयांनी आपल्या परमभक्ताला आश्वासित केलं आणि माणगावात श्रीदत्तमंदिराची स्थापना करविली. ते वर्ष होतं सन १८८३ भगवान श्रीदत्तात्रेय आणि श्रीवासुदेव शास्त्रीबुवा, देव-भक्ताच्या आल्हाददायक लीलांना साक्षी होण्याचे भाग्य माणगावकरांना लाभले. तसेच हजारो भक्तांनी श्रीदत्तात्रेयांच्या तेथील सान्निध्याचा अनुभव घेत आपले लौकिक आणि पारलौकिक कल्याणही साधून घेतले. माणगावचे श्रीदत्तमंदिर हे श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचाच एक भाग आहे, अशी धारणा श्रीवासुदेव शास्त्रीबुवांची होती. अशाप्रकारे सात वर्ष गेल्यानंतर एके दिवशी वासुदेव शास्त्रीबुवांनी माणगाव सोडण्याची श्रीदेवांची आज्ञा झाली. जितक्या आत्मीयतेने श्रीवासुदेव शास्त्रीबुवांनी ते दत्तस्थान उभारलं आणि वाढवलं होतं, तितक्याच निरपेक्षेतेने आणि तत्परतेने त्यांनी आपल्या सौभाग्यवतींसह पौष मासात सन १८८९ मध्ये श्रीक्षेत्र माणगाव सोडले आणि तीर्थयात्रेला प्रारंभ केला.

# डॉ. मारिया मॉंटेसरी: एक जगप्रसिद्ध बालशिक्षणतज्ज्ञ

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

डॉ. मारिया मॉंटेसरी या इटली देशातील एक प्रसिद्ध बालशिक्षणतज्ज्ञ, वैज्ञानिक आणि विकिपीडिया चिकित्सक होत्या. त्यांनी बालशिक्षणात क्रांती घडवून आणणारी 'मॉंटेसरी शिक्षणपद्धति' विकसित केली. त्यांचा जन्म दि. ३१ ऑगस्ट १८७०मध्ये इटलीतील चियारावले शहरात झाला. त्या इटलीमधील वैद्यकीय पदवी (एम.डी.) मिळवणाऱ्या पहिल्या महिला डॉक्टर ठरल्या. सुरुवातीला मनोरुग्ण व बौद्धिक अक्षमता असलेल्या मुलांवर काम करताना त्यांना समजले की, योग्य शास्त्राधारित व ज्ञानेंद्रियांवर आधारित शिक्षण दिल्यास मुलांचा विकास वेगाने होतो. मॉंटेसरी शिक्षणपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये.

स्वयं-अध्ययनः मुलांवर जबरदस्ती न करता त्यांना स्वतःच्या कृतीतून व अनुभवातून शिकण्याचे स्वातंत्र्य देणे?

ज्ञानेंद्रियांचा विकासः खेळ, लाकडी वस्तू आणि विविध कृतींच्या माध्यमातून पाहणे, स्पर्श करणे व ऐकणे याद्वारे आकलन वाढवणे. लहान मुलांचे फर्निचरः मुलांच्या उंचीनुसार लहान टेबल्स, खुर्च्या आणि सहज हात पोहोचेल अशी कपाटे वापरण्याची अभिनव सुरुवात त्यांनी केली.

व्यवहारोपयोगी शिक्षणः स्वतःचे हात धुणे, झाडू मारणे, झाडांची व पाळीव! प्राण्यांची काळजी घेणे यांसारख्या रोजच्या सवयींच्या कृती शिक्षणात समाविष्ट केल्या.

भारतभेट आणि कार्य- डॉ. मारिया मॉंटेसरी सन १९३९ मध्ये भारतात आल्या आणि येथे जवळपास १० वर्षे राहून बालशिक्षणाचा प्रसार केला. त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव गिजुभाई बधेका आणि ताराबाई मोडक यांसारख्या भारतीय शिक्षणतज्ज्ञांवर पडला.

प्रेरणादायी जीवन कहाणी

देशविदेशातील ज्या शिक्षणपद्धती आणि त्या पद्धती शोधून काढणाऱ्या ज्या मोजक्या शिक्षणतज्ज्ञांची ओळख करून दिली जाते, त्यात इटलीच्या मारिया मॉंटेसरींचा समावेश असतो म्हणजे असतोच. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमामध्ये (बी.एड) शैक्षणिक तत्त्वज्ञान या विषयात देशविदेशातील ज्या शिक्षणपद्धती आणि त्या पद्धती शोधून काढणाऱ्या ज्या मोजक्या शिक्षणतज्ज्ञांची ओळख करून दिली जाते, त्यात इटलीच्या मारिया मॉंटेसरींचा समावेश असतो म्हणजे असतोच. लहान मुलं मोठांचे ऐकत नाही म्हणजे ऐकण्यासाठी त्यांना फक्त बदडूनच काढले पाहिजे असा जो सर्वसामान्य आणि सर्वमान्य समज होता, त्या काळात वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेली एक मुलगी सहा वर्षांखालील मुलांच्या शिक्षणासाठी काही करू पाहते. या वयोगटातील मुला-मुलींसाठी शिकणे आणि शिकवणे हे सहज कसे होईल यासाठी धडपडते, म्हणजे हे एक प्रकारे लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यासारखीच गोष्ट झाली. सहा वर्षांखालील मुलांना सहज सुलभ शैक्षणिक साहित्य तयार करणे ही त्या काळाच्या मानाने फारच पुढची गोष्ट होती. जिथे जन्मदाते वडील आपल्या शिक्षणाला विरोध करत होते (पुढे हा विरोध मावळला) तिथे काळाच्या बरीच पुढे असलेली ही शिक्षण पद्धती समाज सहज स्वीकारेल हे होणं शक्य नव्हतं. या सगळासाठी डॉ. मारिया मॉंटेसरी यांना करावा लागणारा संघर्ष, त्यांच्या मार्गात आलेले खाचखळगे तसेच नंतरच्या काळात त्यांनी शोधलेली व जगमान्य झालेली बालशिक्षण पद्धती. डॉ. मारिया मॉंटेसरींचा असा हा विस्तीर्ण जीवनपट उलगडला आहे ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकरांनी. आपल्या डॉ. मारिया मॉंटेसरी या पुस्तकात. इंडस सोर्स बुक्स प्रकाशनातर्फे हे पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले आहे.

डॉ.मारिया मॉंटेसरी यांचा जन्म दि. ३१ ऑगस्ट १८७० रोजी इटलीतील चियाराव्हॅले या गावात झाला. त्यांचे वडील अलेसँड्रो, हे सरकारी सेवेत लेखापाल होते आणि त्यांची आई, रेनिल्डे स्टॉपानी, सुशिक्षित असून त्यांना वाचनाची आवड होती. मॉंटेसरी कुटुंब सन १८७५मध्ये रोममध्ये स्थलांतरित झाले आणि पुढच्याच वर्षी मारियाला स्थानिक सरकारी शाळेत दाखल करण्यात आले. आपल्या शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच पारंपरिक अडथळे तोडून, मारियाची सुरुवातीला अभियंता होण्याची आकांक्षा होती. जेव्हा मारियाने माध्यमिक शिक्षण पूर्ण केले, तेव्हा तिने वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊन डॉक्टर बनण्याचा निश्चय केला. तिच्या पालकांनी तिला शिक्षण क्षेत्रात येण्यासाठी प्रोत्साहन दिले असले तरी, मारियाला वैद्यकशास्त्रातील पुरुषप्रधान क्षेत्रातच शिक्षण घ्यायचे होते. सुरुवातीला नकार मिळाल्यानंतर, पोप लिओ तेरावा यांच्या पाठिंब्याने, मारियाला अखेरीस सन १८९०मध्ये रोम विद्यापीठात प्रवेश मिळाला आणि ती इटलीमधील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या पहिल्या महिलापैकी एक बनली. स्त्री असल्यामुळे अनेक अडथळ्यांना तोंड देऊनही डॉ. मारिया जुलै १८९६ मध्ये डॉक्टर म्हणून पात्र ठरल्या.

त्यांच्या वैद्यकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यानंतर लगेचच, मारिया महिला हक्क चळवळीत सामील झाली. रुग्णांवर उपचार करण्यातील तिच्या उच्च क्षमतेसाठी, तसेच सर्व सामाजिक वर्गांतील रुग्णांना दाखवलेल्या आदरासाठी ती ओळखली जाऊ लागली. १८९७ मध्ये, मारिया रोम विद्यापीठाच्या मानसोपचार क्लिनिकमधील एका संशोधन कार्यक्रमात स्वयंसेवक म्हणून सामील झाली. या कामामुळे तिला अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या गरजांमध्ये सखोल रस निर्माण झाला. विशेषतः, १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील दोन फ्रेंच व्यक्तींच्या कायार्मुळे, जीन-मार्क इटार्ड, ज्याने "अवेरॉनच्या रानटी मुला"सोबत काम करून नाव कमावले होते, आणि त्याचा विद्यार्थी एडवर्ड सेग्विन. मारियाची ऑर्थोफ्रेनिक स्कूल नावाच्या नवीन संस्थेच्या सह-संचालक म्हणून नियुक्ती झाली. सन १८९८मध्ये शाळेतील तिचा सह-संचालक ज्युसेप्पे मोंटेसानोसोबतच्या संबंधातून मारियाने मारिओला जन्म दिला. वयाच्या अठ्ठावीसव्या वर्षी डॉ. मारियाने तिचा वादग्रस्त सिद्धांत मांडायला सुरुवात केली की, मानसिक आणि विकासात्मकदृष्ट्या अक्षम मुलांना मिळणाऱ्या पाठिंब्याचा अभाव हेच त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीचे कारण आहे. सामाजिक सुधारणेची संकल्पना डॉ. मारियाच्या संपूर्ण आयुष्यात एक प्रमुख विषय बनली, मग ती लिंग-भूमिकांसाठी असो किंवा मुलांच्या हक्कांसाठीच्या लढ्यासाठी असो.

सन १९०१ मध्ये डॉ.मारियाने शैक्षणिक तत्त्वज्ञान आणि मानव वंशशास्त्राचा स्वतःचा अभ्यास सुरू केला, तसेच विद्यार्थ्यांना व्याख्याने व शिक्षण देण्यास सुरुवात केली. १९०४ ते १९०८ या काळात त्या रोम विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र शाळेत व्याख्यात्या होत्या. याच काळात रोमचा झपाट्याने विकास झाला, परंतु बाजाराच्या सट्टेबाजीच्या स्वरूपामुळे दिवाळखोरी आणि झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. सॅन लॉरेन्झो हा असाच एक भाग होता, जिथे पालक कामावर जात असल्यामुळे मुलांना घरातच मोकाट सोडले जात असे. मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी मुलांना दिवसा काहीतरी काम मिळावे या प्रयत्नात, मारियाला तिचे साहित्य आणि पद्धती 'सामान्य' मुलांसमोर सादर करण्याची संधी मिळाली. तिथे, १९०७ मध्ये, तिने ऑर्थोफ्रेनिक शाळेत विकसित केलेले काही शैक्षणिक साहित्य आणून पहिले "कासा देई बाम्बिनी" (बालगृह) उघडले. डॉ. मारियाने मुलांच्या वातावरणात अनेक विविध उपक्रम आणि इतर साहित्य ठेवले, पण फक्त तेच ठेवले जे त्यांना गुंतवून ठेवत होते. तिच्या लक्षात आले की, ज्या मुलांना त्यांच्या नैसर्गिक विकासाला चालना देणाऱ्या वातावरणात ठेवले जाते, त्यांच्यामध्ये स्वतःला शिक्षित करण्याची शक्ती असते. १९०९ पर्यंत मारियाने तिच्या नवीन पद्धतीचा पहिला प्रशिक्षण अभ्यासक्रम सुमारे १०० विद्यार्थ्यांना दिला.

या काळातील तिच्या नोंदींमधून त्याच वर्षी इटलीमध्ये प्रकाशित झालेल्या तिच्या पहिल्या पुस्तकासाठी साहित्य मिळाले, जे १९१२ मध्ये 'द मॉन्टेसरी मेथड' या नावाने अमेरिकेत भाषांतरित होऊन प्रसिद्ध झाले आणि नंतर २० भाषांमध्ये अनुवादित झाले. यानंतर मॉन्टेसरी पद्धतीच्या मोठ्या विस्ताराचा काळ सुरू झाला. जगभरात मॉन्टेसरी संस्था, प्रशिक्षण कार्यक्रम आणि शाळा उदयास आल्या, आणि मारिया सार्वजनिक भाषणे व व्याख्यानांसाठी प्रवासात व्यस्त झाली; यातील बराचसा प्रवास तिने अमेरिकेत, तसेच युके आणि संपूर्ण युरोपमध्ये केला.

डॉ.मारिया सन १९१७ पासून स्पेनमध्ये राहत होत्या. तिथे मारिओ आणि त्यांची पत्नी हेलन क्रिस्टी हेही त्यांच्यासोबत सामील झाले, जिथे त्यांनी त्यांची चार मुले मारिओ ज्युनियर, रोलँडो, मारिलेना आणि रेनिल्डे यांचे संगोपन केले. सन १९२९ मध्ये आई आणि मुलाने मारिया यांचे कार्य पुढे चालवण्यासाठी असोसिएशन मॉन्टेसरी इंटरनॅशनलची स्थापना केली. युरोपमधील फॅसिझमच्या उदयाचा मॉन्टेसरी चळवळीच्या प्रगतीवर मोठा परिणाम झाला. १९३३ पर्यंत नाझींनी जर्मनीतील सर्व मॉन्टेसरी शाळा बंद केल्या होत्या, आणि मुसोलिनीने इटलीमध्येही तेच केले. १९३६ मध्ये स्पॅनिश गृहयुद्धापासून वाचण्यासाठी मारिया आणि मारिओ इंग्लंडला गेले, त्यानंतर नेदरलँड्सला गेले, जिथे ते एडा पिअरसनच्या कुटुंबासोबत राहिले; जी पुढे मारिओची दुसरी पत्नी झाली. सन १९३९ मध्ये भारताचा तीन महिन्यांचा व्याख्यान दौरा सात वर्षांच्या वास्तव्यात बदलला, कारण युद्ध सुरू झाल्यामुळे मारिओला नजरकैदेत ठेवण्यात आले आणि मारियाला नजरकैदेत ठेवण्यात आले; ब्रिटिश सरकारने त्यांना इटालियन नागरिक म्हणून ताब्यात घेतले. भारतात, मारियाने 'कॉस्मिक एज्युकेशन'च्या माध्यमातून ६ ते १२ वयोगटातील मुलांना आधार देण्याच्या आपल्या पद्धतीचा विकास करण्यास सुरुवात केली. तिच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त मारिओला मुक्त करण्याची तिची विनंती मान्य झाली आणि त्यांनी मिळून एक हजाराहून अधिक भारतीय शिक्षकांना प्रशिक्षण दिले.

सन १९४६ मध्ये ते नेदरलँड्सला परतले आणि पुढच्या वर्षी त्यांनी 'शिक्षण आणि शांतता' या विषयावर युनेस्कोला संबोधित केले. डॉ. मारिया यांना सन १९४९, १९५० आणि १९५१ या सलग तीन वर्षांसाठी नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. त्यांचा शेवटचा सार्वजनिक कार्यक्रम सन १९५१मध्ये लंडन येथील ९वा आंतरराष्ट्रीय मॉंटेसरी कॉंग्रेस होता. डॉ. मारिया मॉंटेसरी यांचे वयाच्या ८१व्या वर्षी, दि. ६ मे १९५२ रोजी नेदरलँड्समध्ये निधन झाले. त्यांनी आपल्या कायार्चा वारसा आपला मुलगा मारिओ याच्याकडे सोपवला. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

- ९६९९८३६७१७

# 'जीवा' जाहिरात: ब्रँडिंग की सांस्कृतिक चूक?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा


भारतीय बाजारपेठेत सण आणि उत्सवांचे स्थान केवळ व्यावसायिक उलाढालीपुरते मर्यादित नसून ते थेट सामाजिक आणि कौटुंबिक भावनांशी जोडलेले आहे. अलीकडच्या काळात 'जीवा' या दागिन्यांच्या ब्रँडने रक्षाबंधनानिमित्त अभिनेत्री कृती सेनन हिला घेऊन प्रदर्शित केलेल्या सुमारे ३५ सेकंदांच्या जाहिरातीने डिजिटल विश्वात एका मोठ्या वैचारिक मंथनाला वाट करून दिली आहे. या जाहिरातीतील पाळीव प्राण्याला राखी बांधण्याचा प्रसंग आणि अभिनेत्रीचा पेहराव यांवरून सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. हा संपूर्ण वाद केवळ एका ३५ सेकंदांच्या क्लिपपुरता मर्यादित नसून, आधुनिक जाहिरात विश्वाची सर्जनशीलता, सांस्कृतिक मूल्ये आणि डिजिटल जनमताचे मानसशास्त्र यांमधील वाढत्या अंतर्विरोधाचे प्रतिनिधित्व करतो.

**सर्जनशीलता आणि सांस्कृतिक मर्यादांचा संघर्ष :**

भारतीय कुटुंबव्यवस्थेत सणांचे विधी आणि परंपरा या पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या श्रद्धास्थानांवर आधारलेल्या आहेत. आधुनिक जीवनशैलीत पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्याचा दर्जा देणे आणि त्यांच्यावरील निष्कलंक प्रेम व्यक्त करणे ही एक स्वाभाविक भावना असली, तरी तिची मांडणी पारंपरिक धार्मिक विधींच्या चौकटीत करताना समाजातील काही घटकांकडून विरोध होणे अपरिहार्य ठरते. जाहिरातदारांचा उद्देश आधुनिकता, सर्वसमावेशकता आणि नात्यांमधील सूक्ष्म बंध अधोरेखित करण्याचा असला, तरी सणांच्या मूळ संकेतांना धक्का लागल्याची भावना निर्माण झाल्यास अशा संकल्पनांचे स्वागत होण्याऐवजी सांस्कृतिक आक्षेपांना तोंड द्यावे लागते. पेहरावाच्या निवडीवरून झालेली चर्चाही हेच दर्शवते की, प्रेक्षक आजही पारंपरिक उत्सवांच्या संदर्भात विशिष्ट मयार्दा आणि औपचारिकतेची अपेक्षा ठेवतात.

**व्यावसायिक हेतू आणि तथ्य पडताळणी:**

कोणत्याही जाहिरातीच्या मूल्यमापनात तिच्यामागील व्यावसायिक उद्दिष्ट समजून घेणे आवश्यक असते. या जाहिरातीची तथ्य पडताळणी केली असता, हा कोणत्याही धार्मिक परंपरेचा जाणीवपूर्वक अवमान करण्याचा प्रयत्न नसून ब्रँडच्या नव्या 'पेट कलेक्शन'ची व्यावसायिक



प्रसिद्धी होती, हे स्पष्ट होते. ग्राहकांच्या बदलत्या प्राधान्यांना ओळखून पाळीव प्राण्यांसाठीचे दागिने ही नवी बाजारपेठ निर्माण करण्याचा हा एक विपणन प्रयत्न होता. मात्र, सोशल मीडियाच्या वेगवान आणि संवेदनशील वातावरणात जाहिरातीतील मूळ संदेशाऐवजी केवळ दृश्य घटकांचे (व्हिज्युअल्स) त्वरित ध्रुवीकरण झाले, ज्यामुळे व्यावसायिक हेतू मागे पडून सामाजिक वादालाच मुख्य केंद्रस्थान मिळाले.

**डिजिटल युगात ब्रँडिंग आणि दीर्घकालीन विश्वासार्हता**

माध्यम विश्लेषणाच्या आणि उद्योग जगताच्या दृष्टिकोनातून, आजच्या डिजिटल युगात 'वादामुळे मिळणारी तात्पुरती प्रसिद्धी' आणि 'दीर्घकालीन ग्राहक विश्वास' यांमधील भेद ओळखणे अत्यंत कळीचे ठरले आहे. सोशल मीडियावर मिळणारे व्ह्यूज किंवा ट्रेन्ड्स तात्कालिक लक्ष वेधून घेऊ शकतात, परंतु ब्रँडचे चिरंतन अस्तित्व हे सामाजिक एकोपा आणि ग्राहकांच्या विश्वासावर आधारलेले असते. त्यामुळे आधुनिक विचार मांडताना तो परंपरेला छेद देणारा न भासता, परंपरेचा आदर ठेवूनच पुढे जाणारा असावा, असा सुवर्णमध्य साधणे हीच जाहिरात क्षेत्राची खरी कसोटी ठरते.

माध्यम विश्लेषक आणि उद्योग जगताच्या दृष्टिकोनातून, सणासुदीच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या आधुनिक जाहिराती आणि त्यावर उमटणाऱ्या प्रतिक्रिया या केवळ एका ब्रँडपुरत्या मर्यादित नसून संपूर्ण भारतीय ग्राहक मानसिकतेचे प्रतिबिंब असतात. 'जीवा'च्या जाहिरातीवरून निर्माण झालेल्या वादाच्या संदर्भात माध्यम तज्ज्ञांचे विश्लेषण असे दर्शवते की, आजच्या डिजिटल युगात सर्जनशीलता आणि सामाजिक संवेदनशीलता या दोन्ही घटकांचा सूक्ष्म समतोल राखणे ही प्रत्येक ब्रँडपुढील सर्वात मोठी आव्हानात्मक कसोटी बनली आहे.

भारतात सण-उत्सव हे केवळ खरेदीच्या संधी नसून त्यामागे पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या धार्मिक व कौटुंबिक भावना जोडलेल्या असतात. अशा वेळी जाहिरातदारांनी नवीन विचार, आधुनिक जीवनशैली आणि प्राण्यांवरील प्रेम यांसारख्या संकल्पना मांडताना मूळ परंपरेचा अनादर होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक ठरते. पाळीव प्राण्यांना कुटुंबाचा भाग मानणे ही आधुनिक काळातील वास्तववादी भावना असली, तरी ती पारंपरिक विधींशी जोडताना सादरीकरणाचा सूर अत्यंत संयमी असावा लागतो, जेणेकरून ग्राहकांच्या एका मोठ्या घटकाची भावना दुखावली जाणार नाही.

सध्याच्या सोशल मीडियाच्या प्रभावामुळे जाहिरातींमधील बारकावे. जसे की पात्रांचा पेहराव किंवा दृश्यांची मांडणीऱ्यांवर त्वरित ध्रुवीकरण होते. तात्कालिक चचेर्मुळे जाहिरातीला 'व्ह्यूज' किंवा प्रसिद्धी मिळत असली, तरी कोणत्याही ब्रँडची खरी ताकद ही ग्राहकांच्या दीर्घकालीन विश्वासावर टिकून असते. वाद निर्माण करून मिळवलेले लक्ष तात्पुरते फायदेशीर वाटू शकते, परंतु दीर्घकाळात ब्रँडने सामाजिक एकोपा आणि सर्वसमावेशकतेला प्राधान्य देणेच व्यावसायिकदृष्ट्या योग्य मानले जाते.

नवीन पिढीला आकर्षित करण्यासाठी आधुनिक मांडणी आवश्यक आहे, मात्र ती मांडणी करताना जुन्या आणि नव्या मूल्यांचा सुवर्णमध्य साधणे हीच परिपक्व ब्रँडिंगची खरी ओळख आहे. प्रेक्षकांचा रोष ओढवून घेण्याऐवजी, संवादातून सकारात्मक संदेश देणे आणि समाजभावनांचा आदर राखून नव्या संकल्पना रुजवणे हाच जाहिरात जगतासाठी सर्वात प्रभावी आणि शाश्वत मार्ग ठरतो.

- ९५६१५९४३०६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# संदीप बारस्कर यांना 'उमा-गणेश स्मृती पुरस्कार-२०२६' प्रदान

## कला-साहित्य क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूरच्या वतीने स्व. गणेश नायडू व स्व. उमा नायडू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'उमा-गणेश स्मृती पुरस्कार-२०२६' प्रोसाऊंडचे संचालक व ध्वनीसंयोजन तज्ज्ञ संदीप बारस्कर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

श्री सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष व माजी आमदार संदीप जोशी यांच्या हस्ते संदीप बारस्कर २५ हजार रुपये रोख, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. रविवारी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश एदलाबादकर यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्यासह बाळ कुळकर्णी, निलेश खांडेकर आणि रुपाली मोरे यांचीही मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य व शिक्षणतज्ज्ञ पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री होते. यावेळी कला, साहित्य, नाट्य आणि ध्वनी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेश नायडू हे कलेचे उपासक होते, असे सांगत प्रकाश एदलाबादकर यांनी त्यांच्या अक्षरकलेपासून नेपथ्य कौशल्यापर्यंतच्या विविध गुणांची आठवण सांगितली. यावेळी त्यांनी मंचावरील संदीप जोशी आणि संदीप बारस्कर यांच्या कष्टाळू व शिस्तबद्ध स्वभावाचाही आवर्जून उल्लेख केला. पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री यांनी संदीप बारस्कर यांच्या कलेचे कौतुक करून भविष्यातही असेच चांगले कार्य करण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविकातून जुन्या आठवणींना उजाळा दिला. गणेश नायडू यांनी कलेची उपासना करत कला व नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी संदीप बारस्कर यांचे अभिनंदन केले.

संदीप बारस्कर यांच्या मातोश्री शांता बारस्कर, पत्नी भाग्यश्री बारस्कर, हेमंत व तुषार नायडू, देवयानी जोशी, विलास मानेकर, विष्णू मनोहर, श्रीपाद अपराजित, शिवशंकर माळोदे, रेणुका देशकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले, तर आभार निलेश खांडेकर यांनी मानले.

### आयुष्यातला सर्वात आनंदाचा दिवस : संदीप बारस्कर

हा माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस आहे. या सन्मानात माझी पत्नी भाग्यश्री ही समान सहभागी आहे. माज्या आईला आणि पत्नीला मी या सन्मानाचे श्रेय देतो. पत्नी ही आपल्या आयुष्याची दिशा दर्शविणारे दिशादर्शक यंत्र आहे असे बारस्क म्हणाले. हेमंत आणि तुषार नायडू यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांचा मी ऋणी आहे, अशा भावना संदीप बारस्कर यांनी व्यक्त केल्या.

-----

### गणेश नायडूंच्या कलेला अभिवादन : संदीप जोशी

राष्ट्रगीत तांदळाच्या दाण्यावर लिहिणारे आणि अचाट कलाकौशल्य असलेले गणेश नायडू यांना प्रत्यक्ष भेटता आले नाही, तरी त्यांच्याबद्दल माझ्या मनात प्रचंड आदर आहे. माझे आणि संदीप बारस्कर यांचे वेगळे नाते आहे. आम्ही अनेक संघर्ष एकत्र पाहिले आहेत. पावसात साउंड सिस्टिमचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले, तरी संदीप खंबीर राहिले असा आवर्जून उल्लेख त्यांनी केला. ते अत्यंत साध्या मनाचे, हसतमुख आणि हुशार व्यक्तिमत्त्व आहेत, असे संदीप जोशी यांनी सांगितले.

## कळमेश्वर खरेदी-विक्री व बाजार समितीची आमसभा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, कळमेश्वर**
कळमेश्वर तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ६७ वी वार्षिक आमसभा सहकार महर्षी बाबासाहेब केदार सभागृहात आयोजीत करण्यात आली होती. यावेळी माजी मंत्री सुनील केदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या सूचनेनुसार सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील खरेदी-विक्री समित्या आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आमसभा एकत्र घेण्याची सूचननेने संस्थेचा सुमारे दोन लाखांचा खर्च वाचल्याचे सांगून राज्य शासनाने संस्थेचा गौरव केल्याची माहिती दिली. संस्थेमार्फत औषधे, बी-बियाणे विक्रीसोबतच यावर्षी' सहकार भारत गॅस' नावाने गॅस एजन्सी सुरू करण्यात आल्याची माहिती कोढे यांनी दिली.



खतांच्या टंचाईचा मुद्दा उपस्थित करत सुनील केदार यांनी सरकारच्या धोरणावर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरही केदार यांनी सरकारला धारेवर धरले. आमसभेत संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-वाटप, कर्जमर्यादा, अंदाजपत्रक, लेखापरीक्षण अहवाल तसेच धापेवाडा येथील सहकार भारत गॅस गोदाम व शोरूमसाठी झालेल्या खर्चास मंजुरी देण्यासह विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. याप्रसंगी माजी जि. प. अध्यक्ष मुक्ता कोकडे, माजी उपाध्यक्ष कुंदा राऊत, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अश्विन बैस, सावनेर बाजार समिती सभापती रवींद्र चखले, पंचायत समिती माजी सभापती श्रावणदादा भिंगारे, माजी उपसभापती नरेंद्र पालटकर, खरेदी विक्री उपाध्यक्ष आशिष देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस अविनाश गोतमारे,माजी जि प सदस्य देवानंद कोहळे, अरविंद रामावत, बाजार समिती उपसभापती प्रतिभा पालटकर, यांच्यासह सर्व संचालक मंडळ मोठ्या संख्येने शेतकरी सभासद, खरेदी-विक्री बाजार समितीचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

## तिज मातेच्या गायनाने नागपूर नगरीत गोर बंजारा समाजाचा उत्साह द्विगुणित

### पारंपरिक वेशभूषेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; संस्कृती, परंपरा व सामाजिक एकतेचे दर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गोर बंजारा समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नागपूर नगरीत तिज मातेच्या पारंपरिक गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. प्रा.डी.बी. चव्हाण नायक व नितीन राठोड कारभारी यांच्या पुढाकारातून मनोज भाऊ राठोड यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तिज मातेच्या पारंपरिक गायनाला बंजारा समाजाच्या सांस्कृतिक जीवनात विशेष महत्त्व आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाजातील महिला एकत्र येत पारंपरिक गीते, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करतात.



याच उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात नागपूर शहरातील गोर बंजारा समाजातील महिला, पुरुष, कर्मचारी, अधिकारी तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. कार्यक्रमस्थळी महिलांनी पारंपरिक बंजारा वेशभूषा परिधान करून तिज मातेचे पारंपरिक गीत गायन केले. पारंपरिक गीतांच्या सुरांनी परिसरात उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरण निर्माण झाले. महिलांच्या सामूहिक गायनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. बंजारा समाजाची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, गीत-संगीत आणि लोकपरंपरा यांचे मनोहारी दर्शन यावेळी उपस्थितांना घडले.

या कार्यक्रमाला नागपूर शहरातील कर्मचारी व अधिकारी वर्गासह समाजातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. राम राठोड, सहदेव चव्हाण, डॉ.एन.एस. पवार यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि हजारोच्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. समाजबांधवांनी एकत्र येत तिज मातेच्या गायनात सहभाग घेतला आणि पारंपरिक संस्कृतीचा आनंद घेतला.

तिज मातेच्या गायनाच्या माध्यमातून केवळ धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे पालन न करता समाजातील एकता, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याचा संदेशही देण्यात आला. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले समाजबांधव या निमित्ताने एकत्र आल्याने सामाजिक संवाद आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. गोर बंजारा समाजाची संस्कृती ही लोककला, पारंपरिक गीत-संगीत, वेशभूषा आणि विविध रूढी-परंपरांनी समृद्ध आहे. आधुनिक काळात बदलत्या जीवनशैलीमुळे पारंपरिक लोककला आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत तिज मातेच्या गायनासारख्या पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करून नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे महत्त्वाचे असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या समाजबांधवांनी तिज मातेच्या पारंपरिक गायनातून मिळणारा आनंद आणि सामूहिक सहभागाची भावना व्यक्त केली. समाजातील ज्येष्ठांनी तरुण पिढीने आपल्या पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपून तो पुढील पिढीपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले. दरम्यान, तिज मातेच्या गायनाने संपूर्ण कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महिला आणि समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. पारंपरिक संस्कृतीचे जतन, सामाजिक एकोपा आणि समाजातील बंधुभाव अधिक दृढ करण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जावे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सहदेव चव्हाण यांनी माहिती दिली.

## बदलापूरमध्ये सातव्या थराला सलामी दिल्यानंतर अचानक गोविंदाचा सेफ्टी बेल्ट

**बदलापूर :** बदलापूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या माखन चोर दहीकाला उत्सवादरम्यान थरारक प्रसंग घडला. शिवसेना युवा सेना शहर प्रमुख, मितेश धुळे यांच्या आयोजनातून या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माखन चोरहंडी फोडण्यासाठी बदलापूरच्या प्रज्वल प्रतिष्ठानच्या माध्यमातून गोविंदांनी सात थरांची सलामी दिली. सातव्या थराला सलामी दिल्यानंतर अचानक सेफ्टी बेल्ट तुटला आणि सातव्या थरावर असलेला चिमुकला थेट खाली कोसळला. हे दृश्य पाहून उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि गोविंदांमध्ये काही काळ खळबळ उडाली. चिमुकला खाली कोसळताच त्याला तातडीने सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. दहीहंडी उत्सवात उंच थर रचताना गोविंदांच्या सुरक्षेसाठी सेफ्टी बेल्टसह विविध सुरक्षा उपाययोजना केल्या जातात. मात्र, सातव्या थराला सलामी दिल्यानंतरच सेफ्टी बेल्ट तुटल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.या थरारक घटनेचा व्हिडिओ सध्या समोर आला असून, दहीहंडी उत्सवादरम्यान घडलेल्या या प्रकाराची जोरदार चर्चा सुरू आहे. याठिकाणी लावलेला सेफ्टी बेल्ट का तुटला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सध्या आयोजकांकडून हा प्रकार कसा घडला, याची चौकशी केली जात आहे.

## चिमुकल्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या बांधून दिला बंधुभाव, प्रेम व सामाजिक ऐक्याचा संदेश

### सार्वजनिक वाचनालय, कान्होली येथे रक्षाबंधन उत्साहात साजरे




**दै. सिंहवाणी वृत्त, कान्होली**
सार्वजनिक वाचनालय, कान्होली येथे रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विशेष उपक्रमात लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या कल्पकतेतून आकर्षक राख्या तयार केल्या. त्यानंतर या राख्या मित्र परिवारातील सदस्यांना व भावंडांना प्रेमाने बांधून रक्षाबंधनाचा आनंद साजरा करण्यात आला. रक्षाबंधन हा केवळ भाऊ- बहिणीच्या प्रेमाचा सण नसून परस्परांतील जिव्हाळा, आपुलकी, विश्वास, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे.

याच भावनेतून सार्वजनिक वाचनालयात हा उपक्रम राबविण्यात आला. चिमुकल्यांनी विविध रंग, सजावटीचे साहित्य आणि कलात्मक कल्पनांचा वापर करून स्वतः राख्या तयार केल्या. राखी तयार करताना मुलांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. कार्यक्रमा दरम्यान मुलांनी एकमेकांना राखी बांधत प्रेम आणि मैत्रीचे नाते अधिक दृढ केले. उपस्थित नागरिक, पालक आणि मित्र परिवारातील सदस्यांनी मुलांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले. अशा सर्जनशील उपक्रमांमुळे मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यात संस्कार, सहकार्याची भावना, सामाजिक जाणीव आणि एकोप्याची भावना निर्माण होण्यास मदत होते, असे उपस्थितांनी सांगितले. कार्यक्रमस्थळी रक्षाबंधनाच्या निमित्ताने आकर्षक सजावट करण्यात आली होती.

चिमुकल्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले होते. विविध वयोगटातील मुलांनी सहभागी होत एकमेकांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले. या उपक्रमातून 'एकमेकांची काळजी घेणे आणि परस्परांचा सन्मान करणे' हा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मिलिंद कोवे (उपसरपंच), प्रदीप इटनकर, भावेश वलके, अरविंद कोवे, नंदू कुमरे, गौरव गोंडगे, मंगल कोवे, राज कळंबे, कुणाल कोवे, हर्षल कंगाले, तन्मय कोवे, नीता रंदई, आंचल कोवे, जयश्री आडे, मीरा मडावी, देवयानी इटनकर आणि करिष्मा अगले यांनी विशेष सहकार्य केले.

या कार्यक्रमास कान्होली गावातील नागरिक, पालक, महिला, युवक तसेच लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत अशा सामाजिक व संस्कारक्षम उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व बालकांचे तसेच कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या मित्र परिवारातील सदस्यांचे आभार मानण्यात आले. वाचनालयाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे रक्षाबंधनाचा सण आनंद, स्नेह आणि सामाजिक एकात्मतेच्या वातावरणात साजरा झाला.

**थोडक्यात**

## खेळामुळे होतो खरा व्यक्तिमत्व विकास : डॉ. मूर्ती



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**
प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोंदिया द्वारा संचलित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी भारतरत्न मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिवसानिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस नारायण मूर्ती तर प्रमुख अतिथी पदी महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ संजय बिरणवार हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर डॉ. बिरणवार यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांनी भारतासाठी मिळवलेल्या वेगवेगळ्या पारितोषिकांबद्दल तसेच त्यांच्या कार्यकाळात भारताने ऑलिंपिक मध्ये केलेल्या कामगिरीबद्दल सविस्तर विवेचन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. मूर्ती यांनी देखील क्रीडा दिवसाच्या महत्त्व बद्दल विद्यार्थ्यांना सांगून प्रत्येक विद्यार्थ्यांने किमान एका तरी खेळामध्ये आपली रुची ठेवावी व तो खेळ खेळावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे करण्यात आले याकरिता सर्व विद्यार्थी प्राध्यापक पुरंदर व शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

## कळमेश्वर तालुक्यातील २,११२ बोगस शिधापत्रिकाधारक वगळणार

**दै. सिंहवाणी वृत्त, कळमेश्वर**
कमी उत्पन्न दाखवून सरकारी धान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारच्या अन्नपुरवठा विभागाच्या वतीने मिशन सुधार अभियान राबविण्यात येत आहे. आधार कार्ड डेटा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील माहिती भूमी अभिलेख, कृषी विभागाचे अँग्री स्टॅक, प्रादेशिक मोटर परिवहन विभाग व अन्य तांत्रिक आधारे किमान दहा निकषाच्या आधारे शिधापत्रिका धारकाची पडताळणी केली जाणार असून यामध्ये कळमेश्वर तालुक्यातील सद्यस्थितीत जवळपास २११२ शिधापत्रिकाधारक लाभार्थी वगळले जाणार आहे.




सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत देशातील गरीब गरजू लाभार्थ्यांना रेशन धान्याचा लाभ दिला जातो. परंतु कमी उत्पन्न दाखवून श्रीमंत या धान्याचा लाभ घेत आहेत व खरे गरजू या धान्यापासून वंचित आहेत. खऱ्या आणि गरजू लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अन्नपुरवठा विभागातर्फे मिशन सुधार अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत. रेशन वितरणातील काळाबाजार रोखणे, दुबार, मृत व स्थलांतरित आणि अपात्र लोकांची नावे रेशन कोविक पुरवठापत्रिका शिवा महाराष्ट्र शासन कार्डमधून वगळणे, निश्चित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असणे, शासकीय निमशासकीय सेवेत असणे, पेन्शनर, व्यवसायिक, खासगी नोकरी करणारे, रेशन कार्डमध्ये मृत व्यक्तीच्या नावाच्या समावेश असणे त्यांचा मोफत स्वस्त धान्याचा पुरवठा बंद केला जाणार आहे. या मिशन सुधार पडताळणी अभियानातून शासनाचा फायदा होणार आहे. रेशन दुकानांमधून अंत्योदय लाभार्थ्यांना ३५ किलो व प्राधान्य गट, योजनेमधून मानसी ५ किलो धान्याचे वाटप केले जाते. धान्य घेणाऱ्यांमध्ये ग्रामीण भागाकरिता ४४ हजार रुपये आणि शहरी भागाकरिता ५९ हजार रुपये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आखून देण्यात आली आहे. परंतु कमी उत्पन्न दाखवून या योजनेचा लाभ घेत आहेत.

## खापरखेडा येथे ब्रह्माकुमारीजच्यावतीने रक्षाबंधन साजरे

### पवित्रता आणि व्यसनमुक्तीचा दिला संदेश




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या खापरखेडा येथील सेवाकेंद्रावर रक्षाबंधनाचा पावन सण उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात परमात्म्याच्या स्मरणाने झाली. याप्रसंगी उपस्थितांना पवित्रता, सदाचार आणि व्यसनमुक्तीचा संकल्प देण्यात आला. कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या व कामठी सेवाकेंद्र संचालिका ब्रह्माकुमारी प्रेमलता दीदी यांनी रक्षाबंधनाच्या आध्यात्मिक रहस्यावर प्रकाश टाकला हा सण केवळ रेशमी धागा बांधण्यापुरता मर्यादित नसून, कुटुंब आणि समाजातील नातेसंबंध हे सच्चे प्रेम व आदरावर आधारित असले पाहिजेत, ही शिकवण देतो. आपण आपल्यातील वाईट विचार, नकारात्मकता आणि स्वार्थाचा त्याग करून पवित्रता व प्रेमाचे जीवन जगले पाहिजे. हा सण संपूर्ण मानवता, निसर्ग आणि समाजाच्या कल्याणाचा संदेश देतो असे त्या म्हणाल्या.

आयोजना दरम्यान उपस्थितांना आत्मस्मृतीचे प्रतीक म्हणून चंदनाचा टिळा लावून रक्षासूत्र (राखी) बांधण्यात आले. परमपिता परमात्मा शिव हेच आपल्या सर्व आत्म्यांचे सच्चे रक्षक आहेत आणि त्यांच्याशी जोडले जाणे हीच जीवनातील सर्वात मोठी सुरक्षा आहे, असा विचार या वेळी मांडण्यात आला. या कार्यक्रमाला सरपंच मीनाक्षी तागडे, माजी जिल्हा परिषद सभापती चंद्रशेखर पानतावणे, कपिल वानखेडे, डॉ. ओंकार केळवदे, केशव पानतावणे, संजू गरजे यांची विशेष उपस्थिती होती या प्रसंगी शीलू दीदी, सपना दीदी यांच्यासह मोठ्या संख्येने ब्रह्माकुमारी बंधू-भगिनी उपस्थित होते.

थोडक्यात

## बिनासंगम गावात बिबट्याचा धुमाकूळ, गाय ठार

कामठी वनपरिक्षेत्र विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील बिनासंगम गावात मागील दोन दिवसांपासून बिबट्याने धुमाकूळ घातला आहे बिबट्याच्या हल्ल्यात एक गाय ठार झाल्याची घटना ३० ऑगस्ट रविवारला



सकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे ग्रामपंचायत मागील भागात बिबट्याचे ठसे आढळून आल्यामूळे बिनासंगम गावात दहशत पसरली असून कर्तव्यात कसूर करणाऱ्या कामठी वनपरिक्षेत्र विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बिनासंगम गाव राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदार संघात आहे ३० ऑगस्ट रविवारला सकाळच्या सुमारास बिनासंगम गावातील प्रगतीशील शेतकरी विजय भडंग यांच्या शेतात गाईवर हल्ला करून बिबट्याने ठार केल्याची घटना उघडकीस आली तर घटनेच्या एक दिवसापूर्वी बिबट्याने तीन महिन्यांच्या गाईच्या वासरावर हल्ला करून ठार केले.

सदर घटनेची माहिती कामठी व खापा वनपरिक्षेत्र विभागाला माहिती देण्यात आली खापा वनपरिक्षेत्र विभागाचे कर्मचारी आशिष खोब्रागडे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला मात्र कामठी वनपरिक्षेत्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसदी दाखविली नाही त्यामूळे कामठी वनपरिक्षेत्र विभागातील अधिकारी कर्तव्यात किती तत्पर आहेत हे दिसून येते. या घटनेत विजय भडंग यांचे जवळपास ४० हजार रुपयांचे नुकसान झाले असून नुकसानभरपाईची मागणी करण्यात येत आहे. मागील अनेक दिवसांपासून शिंगोरी, सावली, भानेगाव, बिनासंगम परिसारत बिबट्याचा वावर आहे बिबट्याच्या हल्ल्यात जवळपास सहा जनावरे ठार झाली आहेत मात्र वनविभाग प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे त्यामूळे दहशत निर्माण करणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

## लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलनात निलेश काळे यांचा 'महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार'ने गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

युवा कर्तृत्व फाऊंडेशन, मानव चेतना जनविकास बहुउद्देशीय संस्था आणि समृद्धी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलन - अमरावती २०२६'मध्ये एडुसन फाऊंडेशनचे संचालक निलेश काळे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अमरावती येथील गाडगेबाबा समाधी मंदिर सभागृहात २३ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्यास पद्मश्री पुरस्कारप्राप्त डॉ. रवींद्र कोल्हे अध्यक्षस्थानी होते. मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार तसेच सामाजिक कार्यकर्ते रविकुमार गजभिये, तसेच मानव चेनता जनविकास सेवा संस्थेचे संस्थापक धनराज हरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी कार्य केल्याबद्दल निलेश काळे यांचा गौरव करण्यात आला. एडुसन फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, कौशल्यविकासाला चालना देणे तसेच गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबविण्यावर त्यांनी भर दिला आहे.

या संमेलनात सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्ते, समाजसेवक आणि कर्तृत्ववान व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला. समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कार्याची समाजासमोर ओळख निर्माण करणे, हा संमेलनाचा प्रमुख उद्देश होता.

## सर्पमित्र व वनविभाग टिमद्वारे मिळाले जखमी हरिणाला जीवनदान

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील खापा येथील आनंद सागर बार बाजुला हर्षल लांजेवार यांच्या शेतात काही भटक्या कुंत्र्याद्वारे भटक्या हरिणाचा पाठलग करत त्याचे लचके तोडत ठार मारण्याचा प्रयत्न केला. सदर घटना हर्षल लांजेवार हे शेतात असल्याने त्यांनी कुत्राला



पळवत लावत वेगळ केले. त्या कुत्राचा हल्यात आलेला हरण भरपुर जखमी झाले तथा हर्षल लांजेवार यानी खापा सर्पमित्र प्रेम खडसे यांना सुचना दिली. वेळ न गमवता सर्पमित्र विशाल शेंडे, सर्पमित्र हर्षल मोहटे, सर्पमित्र प्रेम खडसे, सर्पमित्र सौरभ शेंडे, वरुण वाघमारे, स्वप्निल देशमुख हे घटनास्थळी पोहचून खापा वनपरीक्षेत्र अधिकारी विजय गंगावने यांच्या मार्गदर्शन क्षेत्रसहायक संदिप चौधरी, वनरक्षक रोहीत कुक्लारे, वनरक्षक गोविंदजी मेंढे, वाहनचालक पंकज कोल्हे व सर्पमित्र टिमने व वनविभाग टिमने सुरक्षित पकडून पुढच्या उपचारासाठी ट्रांजिट ट्रिटमेंट सेंटर नागपूर येथे नेण्यात आले.

# नेत्रदानाची चळवळ घराघरांत पोहोचवावी : डॉ. मनीष श्रीगीरीवार

### २०० नेत्रदात्यांच्या परिवाराचा सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याचे सामर्थ्य अवयवदानात आहे. एका व्यक्तीच्या नेत्रदानामुळे चार ते पाच गरजू रुग्णांना दृष्टी मिळू शकते. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे मेंदूमृत व्यक्तीचे विविध अवयव दान करून अनेकांचे प्राण वाचविणेही शक्य आहे. त्यामुळे अवयवदानाबाबतचे गैरसमज दूर करून प्रत्येकाने या सामाजिक कार्यात योगदान द्यावे. नेत्रदानाची चळवळ घराघरांत पोहोचवून ती व्यापक सामाजिक चळवळ करण्याची गरज आहे, असे झेडटीसीसी नागपूरचे अध्यक्ष डॉ. मनीष श्रीगीरीवार यांनी सांगितले.



राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त रोशनी फाऊंडेशनतर्फे २०० नेत्रदात्यांच्या परिवाराचा सन्मान सोहळा रविवारी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स सभागृह, हडस हायस्कूलजवळ, नॉर्थ अंबाझरी रोड येथे आयोजित करण्यात आला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मरणोत्तर नेत्रदान करणाऱ्या नेत्रदात्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. मनीष श्रीगीरीवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर महावितरण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक अध्यक्षस्थानी होते. एम्सच्या नेत्ररोगशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. पूजा बंग, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता तथा नेत्ररोगशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवी चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्ररोगशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दिलीप कुमरे, महात्मे आय बँक अँड हॉस्पिटलचे डॉ. सोनू पंत आणि माधव नेत्रालयचे महासचिव डॉ. अविनाश चंद्र अग्निहोत्री यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रियजनांच्या निधनानंतर नेत्रदानाचा निर्णय घेणाऱ्या कुटुंबांचा त्याग समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याची आठवण ठेवणे आणि त्याला उजाळा देणे हे समाजाचे कर्तव्य आहे. नेत्रदानाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी तरुणांनीही पुढाकार घ्यावा. 'माझ्यानंतर माझे डोळे कोणाच्या तरी आयुष्यात प्रकाश बनतील, असा संकल्प प्रत्येक नागरिकाने करावा, असे आवाहन राजेश नाईक यांनी केले. रोशनी फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र जैन यांनी प्रास्ताविकात नेत्रदानासंदर्भातील गैरसमज दूर करण्याची गरज व्यक्त केली. नेत्रदाता कुटुंबांचा सन्मान हा त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच समाजातील इतर नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात कॉर्निया प्रत्यारोपणाचे लाभार्थी वासुदेव चिचघरे यांनी नेत्रदानामुळे मिळालेल्या नव्या दृष्टीचा अनुभव कथन केला. वृषाली करकरे यांनी सूत्रसंचालन केले. अनिल इंदाने यांनी आभार मानले.

## महापौर निता ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले मनपाच्या मारबत महोत्सवाचे निमंत्रण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात पर्यटकांचा ओघ वाढविण्यासह शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी आणि नागपूरचा सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने भव्य 'मारबत महोत्सवाचे' आयोजन करण्यात येत आहे. महापौर निता ठाकरे यांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराबत महोत्सवाचे आदरयुक्त निमंत्रण दिले. याप्रसंगी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, नगरसेविका श्रीमती वर्षा चौधरी



यांच्यासह आदी उपस्थित होते. यापूर्वी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी देखील दिल्लीत जाऊन विविध मान्यवरांना नागपूरच्या या ऐतिहासिक आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेला नव्या उंचीवर नेण्याच्या उद्देशाने महोत्सवाचे अधिकृत निमंत्रण दिले होते. विशेष म्हणजे, नागपूरची ऐतिहासिक संस्कृती जपणाऱ्या आणि १४५ वर्षांचे ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या या मारबत महोत्सवासाठी मनपाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या देखरेखीत मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. त्यातच एक भाग म्हणून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांना महोत्सवासाठी निमंत्रित केले जात आहे. महोत्सवात नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग राहावा आणि शहराचे वैभव जगासमोर यावे, यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त व्यक्तींना निमंत्रित केले जाणार आहे.

### आई-वडिलांसह पर्यटनास गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा बुडून मृत्यू

**ठाणे** : जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी परिसरातील अकलोली येथे तानसा नदीपात्रात बुडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. रविवारच्या सुट्टी निमित्त कुटुंबासोबत फिरण्यासाठी आलेल्या या दोन्ही भावांना नदीपात्रातील पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडूनमृत्यू झाला. अरुण चौहान आणि आयुष चौहान अशी मृत भावांची नावे असून, या घटनेमुळे चौहान कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दोघांचे वडील रिक्षाचालक असून या दुर्घटनेनं कुटुंबीयांवर मोठं संकट कोसळल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विरार येथील रिक्षाचालक राम बच्चन चौहान हे आपल्या पत्नी, दोन मुले आणि एका लहान मुलीसह रविवारच्या सुट्टीनिमित्त वज्रेश्वरी परिसरात फिरण्यासाठी आले होते. अकलोली येथील गरम पाण्याच्या कुंडावर आंघोळ केल्यानंतर चौहान कुटुंब तानसा नदीपात्राजवळ गेले. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले नदीच्या पात्रात थोडी आत गेली असता, पाणी खोल आणि प्रवाह असल्याने पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही बुडू लागले. नेमकं, त्याचवेळी आई काहीतरी खाण्यासाठी आणण्यास बाजूला गेली होती, तर वडील रिक्षा साफ करत होते.

## रक्षाबंधनानिमित्त १ लाख महिलांनी केला प्रवास



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रक्षाबंधनानिमित्त नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाने महिला आणि १० वर्षांखालील बालकांसाठी २८ ऑगस्ट रोजी आपली बस सेवेमध्ये मोफत प्रवासाची विशेष सुविधा उपलब्ध करून दिली होती. या उपक्रमाला नागपूरकर नागरिकांकडून उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या विशेष सुविधेचा लाभ ९७ हजार ८८९ महिलांनी, तर ९ हजार ८७५ बालकांनी अशा एकूण १ लाख ७ हजार ७६४ प्रवाश्यांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने आपल्या प्रवासासाठी आपली बस सेवेचा लाभ घेतला.

हा विशेष उपक्रम परिवहन विभागाच्या सभापती मंगला खेकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच परिवहन समितीच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने राबविण्यात आला. नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाने या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केली. या उपक्रमाबाबत बोलताना परिवहन विभागाच्या मा. सभापती मंगला खेकरे यांनी नागपूरकररांकडून या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आम्हाला आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली. नागपूरकरांच्या सुविधा आणि हितासाठी भविष्यातही असे अनेक प्रवासी-केंद्रित व नागरिकाभिमुख उपक्रम राबविण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

## 'माझा गट, माझं कुटुंब'चा मंत्र; उमठ्यात शेतकरी गटांची अभूतपूर्व एकजूट!

### सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ अंतर्गत प्रशिक्षण व मोफत चिकट सापळ्यांचे वाटप, सामुहिक शेतीला नवी दिशा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

शेतीसमोरील वाढती आव्हाने, उत्पादन खर्च आणि कीड-रोगांचा प्रादुर्भाव लक्षात घेता शेतकऱ्यांनी एकजुटीने पुढे येत सामूहिक शेतीची कास धरण्याची गरज असून, 'माझा गट, माझं कुटुंब' या संकल्पनेतून उमठा येथे शेतकरी एकजुटीचे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळाले. पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' अंतर्गत गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी उमठा येथे प्रशिक्षण व मोफत चिकट सापळे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.




उमठा येथील शेतकरी पुत्र कापूस उत्पादक गट व जननी महिला कृषी उत्पादक गटाने पुढाकार घेत हा उपक्रम राबविला. सामूहिक प्रयत्न, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर होते. यावेळी प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते पिंटूभाऊ डाखोळे (थडीपवणी) यांच्या वतीने विविध शेतकरी गटांना शेतीसाठी उपयुक्त चिकट सापळ्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे पिकांवरील किडींचा प्रादुर्भाव वेळेत ओळखण्यास मदत होणार असून, शेतकऱ्यांना कीड व्यवस्थापनासाठीही याचा उपयोग होणार आहे.

पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक शिवहरी टेके यांनी प्रास्ताविकातून 'सत्यमेव जयते फार्मर कप'चा प्रवास आणि उद्दिष्टे उपस्थितांसमोर मांडली. शेतकऱ्यांनी गटाच्या माध्यमातून एकत्र येऊन शेतीतील नियोजन, खर्चात बचत, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि परस्पर सहकायार्ची भूमिका मजबूत करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**शेतकऱ्यांची एकजूट हीच काळाची गरज – आमदार चरणसिंग ठाकूर**

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार चरणसिंग ठाकूर म्हणाले, आजच्या काळात शेतीसमोरील आव्हाने मोठी आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटशेतीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. 'माझा गट, माझं कुटुंब' ही संकल्पना शेतकऱ्यांमध्ये एकजूट, विश्वास आणि सहकार्य निर्माण करणारी आहे. सत्यमेव जयते फार्मर कपच्या माध्यमातून शेतकरी गटांना नवी दिशा मिळत असून, सामूहिक प्रयत्नातून शेती अधिक सक्षम आणि उत्पादनक्षम होईल. उमठा येथील शेतकरी पुत्र व जननी गटाने राबविलेला हा उपक्रम निश्चितच इतर गावांसाठी आदर्श ठरेल. कार्यक्रमास सतीश रेवतकर, दिलेश ठाकरे, मोहन मातकर, प्रफुल जोशी, रुपेश पवार, नंदू चरपे, मयूर सोनवणे, सागर राऊत, गोपालराव ठाकरे, प्रकाश घोरपडे, प्रवीण दहेकार, कुमारी पल्लवी गाडगे तसेच निलेश ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात नरखेड तालुक्यातील विविध शेतकरी व महिला उत्पादक गटांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राणी अवंतिका कापूस उत्पादक गट (जोलवाडी), वंदनीय राष्ट्रसंत महिला कापूस उत्पादक गट (दातेवाडी), भूमिकन्या महिला कापूस-तूर उत्पादक गट (दावसा), नौकाई महिला शेतकरी कापूस-संत्रा उत्पादक गट (बरडपवनी), समृद्धी महिला तूर-कापूस उत्पादक गट (जामगाव बु.), भरारी कापूस उत्पादक गट (मायवाडी), शिवकृपा महिला शेतकरी गट (नारसिंगी), राणी लक्ष्मी महिला शेतकरी गट (खरसोली), जिजाऊ कापूस उत्पादक गट (खापा घु.), लक्ष्मी महिला शेतकरी गट (भिष्णूर), शेतमाऊली कापूस उत्पादक गट (खरबडी), अनुसया माता शेतकरी गट (सिंगारखेडा), सह्याद्री महिला शेतकरी गट (सावरगाव), जननी महिला कृषी उत्पादक गट (उमठा), शेतकरी पुत्र कापूस उत्पादक गट (उमठा), बळीराजा शेतकरी गट (रानवाडी) आणि नवीदिशा महिला शेतकरी गट (परसोडी) यांचा सहभाग होता.

विशेष म्हणजे, या उपक्रमात महिला शेतकरी गटांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शेतीच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग आणि सामूहिक प्रयत्नातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणारी नवी ताकद यावेळी अधोरेखित झाली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रवीण पोटपिटे यांनी केले, तर उमठा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश घोरपडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

उमठा येथील हा उपक्रम शेतकरी गटांच्या चळवळीस नवी ऊर्जा देणारा ठरला असून, 'माझा गट, माझं कुटुंब' या संकल्पनेतून सामूहिक शेतीची चळवळ अधिक मजबूत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## रामटेक येथे भुजलीया उत्सव साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी परदेशी, हिंदी भाषिक समाजाच्या वतीने पारंपरिक भुजलीया उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.दि.२९ ऑगस्ट ला शनीवारी सायंकाळी ५ वाजता भुजलीयाची शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. गांधी चौकात विविध राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शोभायात्रेचे स्वागत केले. भुजलीया उत्सवासाठी रक्षाबंधणाच्या आठ ते दहा दिवसांपूर्वी महिलांकडून काजळी अर्थात गव्हाचे दाणे भिजवून बासच्या टोपलीत त्यांची उगवण केली जाते. जवारे उगवल्यानंतर दररोज त्यांची पूजा-अर्चा केली जाते. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी या भुजलीयांचे जलाशयात विधिवत विसर्जन करण्यात येते. यानंतर भुजलीया एकमेकांना भेटस्वरूप देऊन ज्येष्ठ नागरिक व आई-वडिलांचे आशीर्वाद घेतले जातात.

भुजलीया हा उत्सव भाईचारा, एकता, बंधुभाव व सामाजिक सद्भावनेचा संदेश देणारा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कहार, भोई, ढिवर, किराड, मरार, काची, बारई यांसह विविध समाजबांधव शोभायात्रेत सहभागी झाले. यावेळी आशिष जैस्वाल राज्य मंत्री,बिकेंद्र महाजन नगरअध्यक्ष , आलोक मानकर उपाध्यक्ष नगर परिषद, कहार समाज चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे राज्याध्यक्ष बबलू दूधबर्वे, अशोक बर्वे, नगरसेवक माणिक ताकोत, रमेस कारामोरे, रजत गजभिये, अभिषेक डाहारे,माझी नगरसेवक उमेश महाजन, नगरसेविका लक्ष्मीबाई अहिरकर, अनुबाई चंदनबटवे, पी.टी. रघुवंशी, रतीराम रघुवंशी, मन्साराम अहिरकर, किशोर अहिरकर, बबलू दुधबर्वे,घनश्याम बर्वे, बिरज अहिरकर, मोनू रघुवंसी, प्रकाश मोरेसिया, रामप्रसाद बर्वे, वशिस्ट ताकोत, सचिन भारद्वाज,आकाश अहिरकर, विजय अहिरकर, योगेश दूधबर्वे, हरिचंद्र ताकोत, संजय बिसमोगरे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. शोभायात्रेनंतर महिलांनी राखी तलाव येथे भुजलीयांचे श्रद्धापूर्वक विसर्जन केले. रामटेकमधील हा पारंपरिक उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पोरवाल महाविद्यालयात स्व. राकेश पोरवाल यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

शिक्षण प्रसारक मंडळ कामठी द्वारा संचालित सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष उद्योगपती स्व. राकेश पोरवाल यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात तीस रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य अधिकारी माजी प्राचार्य डॉ सुधाकर धोंगडे यांचे हस्ते दीप प्रज्वलन व स्वर्गीय राकेश पोरवाल यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्यअधिकारी किरण सावदकर,नागपूर विद्यापीठाचे माजी कुलपती डॉ सिद्धार्थ विनायक काणे, प्राचार्य डॉ स्वप्निल दहाट, संस्थेचे सचिव विजयकुमार शर्मा,कोषाध्यक्ष अभिमन्यू पोरवाल, अरिहंत पोरवाल, प्रशासकीय अधिकारी डॉ. विनय चव्हाण,संयोजिका डॉ. गजाला हाश्मी, उपप्राचार्य डॉ रेणू तिवारी, डॉ इफथेखान हुसेन,डॉ. विश्वनाथ वंजारी, नरेंद्र मेंढे,लेफ्टनंट मोहम्मद असरार,डॉ विनय शेंडे ,डॉ निकिता अंबादे उपस्थित होते कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते "केसरी"या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी म्हणाले, शिक्षण क्षेत्रात उद्योगपती स्वर्गीय राकेश पोरवाल यांचे फार मोठे मोलाचे योगदान असून प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी त्यांचा आदर्श ठेवून शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याचे आव्हान केले.

रक्तदान शिबिरात तीस रक्तदात्यांनी रक्तदान केले जीएसके ब्लड बँक नागपूरचे डॉ.आशिष खंडेलवाल,डॉ.श्वेता खंडेलवाल यांनी रक्त संकलन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय छत्रसेना अधिकारी लेफ्टनंट प्रा मोहम्मद असरार यांनी केले. संचालन डॉ. प्रियंका भोयर, डॉ.हिना कौसर यांनी केले. आभार डॉ.गजाला हासमी यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.डॉ.प्रशांत धोगळे,डॉ.किशोर ढोले,डॉ. सिद्धार्थ मेश्राम,डॉ. तुषार चौधरी, डॉ. जितेंद्र तागडे, डॉ. महेश जोगी, डॉ. जयश्री ठवरे, प्रा. स्वाती निंबाळकर,प्रा. एस माकडे, किशोर गबड, सुनील भालकर, प्रदीप सपाटे, कुणाल कडू, प्रवीण अंबादे, मंगेश यादव आदींनी परिश्रम घेतले.

## ३ देशी कट्टों और २ जिंदा कारतूस के साथ हिस्ट्रीशीटर गिरफ्तार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

नागपुर में अपराध शाखा की यूनिट-५ ने अवैध हथियारों के खिलाफ बड़ी कार्रवाई की है। जरिपटका थाना क्षेत्र में पुलिस ने एक कुख्यात आरोपी को तीन देशी कट्टों और दो जिंदा कारतूस के साथ गिरफ्तार किया है। आरोपी के पास से दो मोबाइल फोन भी बरामद हुए हैं। पूछताछ में हथियारों के मध्यप्रदेश कनेक्शन की जानकारी सामने आई है। वहीं, मामले में तीन अन्य आरोपी अभी फरार हैं।

क्राइम ब्रांच यूनिट-५ ने मेकोसाबाग के लेंडी मैदान स्थित मातृछाया वाचनालय के पास से आकाश राजन थापा को हिरासत में लिया। तलाशी में दो मैगजीन लगे देशी कट्टे, एक अन्य देशी अग्निशस्त्र, दो जिंदा कारतूस और दो मोबाइल बरामद हुए। कुल १.५७ लाख रुपये का माल जब्त किया गया।

# सावनेरमधील के. जॉन पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्याला सर्पदंश

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शहरापासून थोड्या अंतरावर खापा रोडवर असलेल्या के. जॉन पब्लिक स्कूलमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला सापाने दंश केला. विद्यार्थ्याचा आई, सुनीता घनश्याम कटारे यांनी २८ ऑगस्ट, २०२६ रोजी सावनेर पोलीस ठाण्यात चौकशी आणि आवश्यक कारवाईची मागणी करणारा लेखी अर्ज सादर केला आहे.

सावनेर पोलिसांना सादर केलेल्या अर्जानुसार, सावनेर येथील रहिवासी शौर्य घनश्याम कटारे आणि त्यांचा मुलगा, के. जॉन पब्लिक स्कूलचा विद्यार्थी शौर्य घनश्याम कटारे. ७ ऑगस्ट, २०२६ रोजी, दुपारी सुमारे ३:३० वाजता, शौर्य शाळेच्या मैदानावर असताना त्याला सापाने चावा घेतला. या घटनेनंतर, त्याच्या कुटुंबीयांनी त्याला तात्काळ नागपूरच्या मेयो रुग्णालयात दाखल केले, जिथे त्याच्यावर सुमारे पाच दिवस उपचार करण्यात आले.




पीडित कुटुंबाने सांगितले आहे की, घटनेपूर्वी विद्यार्थ्यांनी साप दिसल्याची माहिती शाळेच्या कार्यालयाला आणि शाळा प्रशासनाला दिली होती. त्यांनी पोलिसांना या प्रकरणाचा तपास करून परिस्थिती स्पष्ट करण्याची विनंती केली आहे. अर्जामध्ये घटनेनंतर विद्यार्थ्यावर झालेल्या उपचारांचा आणि शाळेने दिलेल्या मदतीचा तपशीलही देण्यात आला आहे.

कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, शौर्यला उपचारानंतर घरी आणण्यात आले असून तो अजूनही वैद्यकीय देखरेखीखाली आहे. कुटुंब त्याच्या पुढील उपचारांसाठी आणि औषधोपचारांसाठी आवश्यक व्यवस्था करत आहे. अर्जामध्ये शाळेच्या परिसराची स्वच्छता, मैदानाची देखभाल, नियमित गवत कापणे, कीटकनाशकांची फवारणी, सीमाभिंतींची स्वच्छता, शौचालये, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता यासह विविध समस्यांचा उल्लेख आहे. पालकांनी शाळेच्या शुल्कातील वाढीबाबतही माहिती मागितली आहे.

**पोलिसांच्या कारवाईवर पालकांच्या नजरा**

पीडित विद्यार्थी शौर्यची आई, सुनीता कटारे यांनी सावनेर पोलिसात शाळा व्यवस्थापनाविरोधात योग्य चौकशीची मागणी करणारा लेखी अर्ज दाखल केला आहे. पीडितेच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी, स्थानिक पोलीस एकतर योग्य तपास करून दोषींविरुद्ध गुन्हा दाखल करतात. किंवा ते प्रकरण थातुरमातुर कारवाईचा प्रयत्न करतात,की त्या तपासाला विलंब लावत परत अशा घटनांच्या पुनरावृत्तीची वाट पाहतात. पालक यावर लक्ष ठेवून आहेत.

विद्यार्थ्याच्या आईने पोलीस प्रशासनाला या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची, घटनेची कारणे आणि शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित सर्व बाबींची तपासणी करण्याची विनंती केली आहे. अर्जाच्या आधारे पोलीस या प्रकरणाचा तपास केल्यानंतर पुढील कार्यवाही स्पष्ट होईल.

### शाळेचा निष्काळजीपणा उघडकीस, कुटुंबीयांची पोलीस चौकशीची मागणी

**शाळा व्यवस्थापनाचा निष्काळजीपणा**

अनेकदा असे दिसून आले आहे की, शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन शाळेच्या परिसराच्या योग्य देखभालीकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे अशा घटना घडतात. अनेकदा असे दिसून येते की, पावसाळ्यात शाळा आणि महाविद्यालयाच्या परिसरात पाणी साचते, चिखल, गवत आणि तण वाढते. या भागांची स्वच्छता करणे ही शाळा व्यवस्थापन आणि मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. स्वच्छतेच्या खर्चात काही हजार रुपये वाचवण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने अशी दुर्दैवी घटना घडू देणे ही शरमेची बाब आहे. तहसीलदार अक्षय पोयम आणि सावनेर पंचायत समितीच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे विशेष लक्ष द्यावे आणि असा निष्काळजीपणा दाखवणाऱ्या मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापनावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गडचिरोलीत 'संडे ऑन सायकल' रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रीडा कार्यालय, गडचिरोली आणि सायकल स्नेही मंडळ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३० ऑगस्ट) संडे ऑन सायकल सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. इंदिरा गांधी चौक ते क्रीडा प्रबोधिनी, पोटेगाव रोड असा रॅलीचा मार्ग होता. विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि सायकलप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होत रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नगराध्यक्ष अँड. प्रणोती सागर निंबाळकर यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीचा शुभारंभ केला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी घाटोळे, सायकल स्नेही मंडळाचे जिल्हा सरचिटणीस उदय धकाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, सामाजिक कार्यकर्ते उपेंद्र रोहनकर, प्रा. सुनीता साळवे, सुचिता धकाते आदी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष अँड. प्रणोती निंबाळकर यांनी सहभागी विद्यार्थी, नागरिक आणि सायकलप्रेमींना मार्गदर्शन करताना सायकल चालविण्याचे आरोग्यदायी महत्त्व विशद केले. नियमित सायकल चालविल्यामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यासोबतच पर्यावरणाचे संवर्धन होण्यासही मदत होते. त्यामुळे दैनंदिन जीवनात सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजन**

महान हॉकीपटू स्व. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. क्रीडा व खेळांचा प्रचार-प्रसार, नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागृती, युवक-युवतींमध्ये क्रीडा संस्कृती निर्माण करणे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'संडे ऑन सायकल' रॅलीचे आयोजन करण्यात आले. नर्सरीमध्ये शिकणारा बाल सायकल प्रेमी अश्वित प्रवीण रक्षमवार या बालकाने इंदिरा चौक ते बस स्टॅन्ड पर्यंत सायकल चालवून संडे ऑन सायकलचे आकर्षण ठरले.

अश्वित प्रवीण रक्षमवार रॅलीमध्ये वसंत विद्यालय, राणी दुर्गावती कन्या विद्यालय, विद्याभारती विद्यालय, शिवकृपा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय आणि स्वामी विवेकानंद कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच शिक्षक-शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले.

सायकल स्नेही मंडळाचे मुरलीधर दोनाडकर, विजय साळवे, वरुण धोडरे, उल्हास आखाडे, गिरीष कांबळे, कुणाल पेंदोरकर, सुभाष धंदरे, गुरुदेव रोहणकर, शरद गिऱ्हपुंजे, यांच्यासह मंडळाचे सदस्य सहभागी झाले. जिल्हा क्रीडा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

इंदिरा गांधी चौक-बसस्थानक-क्रीडा प्रबोधिनी, पोटेगाव रोड या मार्गावरून रॅली उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन ऋषिकांत पापडकर यांनी केले.

## ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक करताना आग, भगेमाहिरी टोल नाक्याजवळ ट्रक पेटला

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन केळवद हद्दीत येणाऱ्या भगेमाहिरी टोल नाक्याजवळ शनिवारी रात्री सुमारे ११.१५ वाजताच्या सुमारास ट्रकच्या केबिनमध्ये स्वयंपाक करत असताना अचानक आग लागल्याची घटना घडली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केल्याने ट्रकचा केबिन पेटून उठला. सदर ट्रक झारखंड येथून भोपाळच्या दिशेने जात होता. ट्रकचा क्रमांक JH11-X-1432 असा आहे. भगेमाहिरी टोल नाक्याजवळ ट्रक थांबलेला असताना केबिनमध्ये स्वयंपाक सुरू होता. त्याचवेळी अचानक आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली.



घटनेची माहिती मिळताच हितज्योती फाउंडेशनचे हितेशदादा बनसोड यांनी तत्काळ आशिष सिंग ठाकूर यांना माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून ट्रकला लागलेली आग आटोक्यात आणली. यावेळी हितज्योती आधार फाउंडेशनचे टीम मेंबर आशु गुप्ता यांनीही घटनास्थळी मदतकार्य केले.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग वेळीच नियंत्रणात आणण्यात आली आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेत जीवितहानी झाली की नाही तसेच ट्रकचे किती नुकसान झाले, याबाबत अधिकृत माहिती मिळू शकलेली नाही.

# स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया पोलीस पथकाची धडाकेबाज कारवाई

## कत्तलीसाठी गोवंश जनावरांना निर्दयतेने कोंबून अवैधरीत्या वाहतूक प्रकरणी १३ आरोपीतांविरुद्ध कारवाई, ४२ गोवंश जनावरांची सुटका, ५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-गोंदिया**

पोलीस अधिक्षक गोंदिया गोरख भामरे यांचे निदेर्शाप्रमाणे व पोलीस पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे , स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया येथील पोलीस पथक जिल्हा हद्दीत अवैध धंद्यावर धाड करणेकामी पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय खात्रीशीर माहिती प्राप्त झाली कि, पोलीस स्टेशन सालेकसा हद्दीत मौजा दलदलकूही परिसरातुन दोन कंटेनर ट्रकमध्ये गोवंश जनावरे कोंबून कत्तलीकरिता घेऊन जाणार आहेत.

मिळालेल्या खात्रीलायक गोपनीय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन सालेकसा हद्दीत मौजा दलदलकूही ते धनेगावकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी लावण्यात आली असता मौजा दलदलकूही ते धनेगाव या मार्गावर पोलीस पथकास काही वेळात मौजा दलदलकूहीकडून दोन कंटेनर ट्रक येतांना दिसून आले , पोलीस पथकाने दोन्ही कंटेनर ट्रक थांबवून दोन्ही कंटेनरचे चालक व लेबर यांना खाली उतरवून एका कंटेनरची चालक इद्रिश कलुवा कुरैशी, वय ५० वर्षे, ह.मु. टेकांनाका, नागपुर. मुळ पत्ता आगरा, रुनकुटा, युपी व दुसऱ्या कंटेनरचा चालक अन्वर शब्बीर अली, वय ४६ वर्षे, रा. भाजी मंडी, कामठी, नागपुर व लेबर यांचे समक्ष कंटेनरची पाहणी करण्यात आली असता एका कंटेनर ट्रकमध्ये २५ गोवंश जनावरे व दुसऱ्या कंटेनर ट्रकमध्ये १७ गोवंश जनावरे एकूण ४२ गोवंशिय जनावरे हे दाटीवाटीने कोंबून भरून क्रूरतेने बांधून कत्तलीसाठी घेऊन जात असल्याचे समजले.




दोन्ही कंटेनरची चालक व लेबर यांचे ताब्यातून एकूण ४२ गोवंश जनावरे प्रत्येकी १५ हजार असा एकूण ६,३०,०००/- रुपये व दोन कंटेनर ट्रक चारचाकी वाहन अंदाजे किंमत ४५,००,०००/- रुपये व सदर व्यवसाय करिता मिळून आलेले आरोपीकडून ४ अँड्रॉइड मोबाईल किमती ५७,०००/- रुपये असा एकुण ५१,८७,०००/- रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने व दोन्ही कंटेनरची चालकांना विचारपूस करण्यात आली असता त्यांनी सांगितले कि, आरोपी १) सैफर भाई याने नमुद गोवंश जनावरे दलदलकुही परीसरातून खरेदी करून सदर गोवंश जनावरे कत्तलीसाठी कळमना, नागपुर येथे २) मुंजबिल कुरैशी, रा. कामठी आणि ३) फैजुल हसन, सिताबर्डी, नागपुर यास देण्याकरीता घेवून जाणे असल्याचे सांगितल्याने कंटेनर ट्रक मालक ४) जावेद अहमद मो. मुस्तफा, मु. अक्षय ट्रेडर्स जवळ, माझरी रोड, राजा चौक, उप्पलवाडी, नागपुर तसेच कंटेनर ट्रक मालक ५) हरीलाल ब्रिजभानसिंग, मु. एच.एन. ५१ खडगांव, विश्राम लॉन जवळ, महादेव नगर, लावा वाडी, नागपुर यांनी गोंवश जनावरांना क्षमतेपेक्षा जास्त निर्दयपणे, अमानुषपणे कोंबण्याकरीता सोयीचे करून बदल केला होता. सदर कंटेनर चे चालक ६) इद्रिश कलुवा कुरैशी, वय ५० वर्षे, ह.मु. टेकांनाका, नागपुर. मुळ पत्ता आगरा, रुनकुटा, युपी सदर ट्रक मध्ये असलेले लेबर ७) अब्दुल रहमान असलम, वय ३८ वर्षे, रा. यशोदानगर, नागपुर ८) फैजल अन्सारी, रा. नागपुर तसेच कंटेनर ट्रक चे चालक ९) अन्वर शब्बीर अली, वय ४६ वर्षे, रा. भाजी मंडी, कामठी, नागपुर व लेबर १०) रोहीत राजु डेहरे, वय २५ वर्षे, रा. यशोदानगर, नागपुर ११) गुलाम रसूल मो. आलेनबी, वय ४० वर्षे, मु. टेकानाका, नागपुर १२) रिताबाई मोहबे, रा. कुंभारटोली, आमगांव व १३) रिताबाई मोहबे, रा. कुंभारटोली, आमगांव तिचे पती (नाव माहित नाही) यांनी संगनमत करून अवैधरित्या निर्दयपणे, अमानुषपणे गोवंश जातीचे जनावरांना कत्तलीसाठी वाहतुक करीत असतांनी मिळून आल्याने नमुद आरोपीता विरुध्द कलम ११(१) (डी) (ई) (एच) (के) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतीबंध कायदा १९६०, सहकलम ५(अ), ५(ब), ९, ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद अन्वये पोलीस सस्टेशन सालेकसा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांचे निदेर्शान्वये पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात सपोनि अभिषेक जंगमवार, पोहवा तुलसीदास लुटे, पोहवा राजकुमार खोटेले, पोहवा दुर्गेश तिवारी, पोहवा प्रकाश गायधने, पोशि सुनील डहाके, पोशि हंसराज भांडारकर, चापोशी निलेश ठाकरे, राम खंदारे स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांनी केली.

थोडक्यात

## विश्वकर्मा लोहार समाज संघटनेतर्फे नांदा कोराडी येथे वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

श्री विश्वकर्मा लोहार समाजसंघटनेच्या वतीने आज दुपारी नांदा कोराडी कामेश्वर मंदिर परिसरात रुक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष महादुला राजेश रंगारी, कोराडीचे उपसरपंच आशिष राऊत,महात्मा फुले समता परिषदचे रमेश गिरडकर, सामाजिक कार्यकर्ते रुपेश महाजन, प्रवीण महाजन, श्री विश्वकर्मा लोहार समाज चे नेते महादेव केळकर श्री केशव निंदेकर श्रीराम बावणे, आदी लोहार समाज संघटनेतर्फे नेते उपस्थित होते. वेगवेगळ्या प्रजातीचे रुक्ष लागवड करण्यात आली. यावेळी राजेश रंगारी म्हणाले अल निनोचे संकट संपूर्ण जगावर घोंघावत आहे. मोठ्या प्रमाणात झाडे कापल्या गेल्याने पृथ्वीच्या वातावरणामध्ये असमतोल निर्माण झालेला आहे. विविध उपक्रमासाठी झाडांचा बळी दिला जात आहे. मात्र जितक्या प्रमाणात झाडे कापतात तितक्याच प्रमाणात लागवड करावी जेणे करून पृथ्वीचे वातावरण चांगले राखण्यास मदत होईल.

याप्रसंगी त्यांनी विश्वकर्मा लोहार सामाजिक संघटनेचे या उपक्रमाबद्दल अभिनंदन केले. यावेळी कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी, धनराज मरसकोल्हे, शरद घुग्गुसकर, विजय सोनटक्के, युवराज कांबळे, केशव निंदेकर, राजकुमार शिवणकर, जयंत झिंगरे, प्रभाकर झिंगरे, कृष्णा निंदेकर, नरेंद्र धनाग्रे, दीपक केळकर मंगेश बावणे, सुवर्णा नोंदेकर, दिनेश मेश्राम, रुपाली बावणे, रेशमा सोनटक्के, हिरा केळकर यांनी कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आशिष राऊत यांनी संपूर्ण झाडे रुक्षारोपणासाठी उपलब्ध करून दिली.

## गुमथळा येथे शव वाहिणीचे लोकार्पण



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

तालुक्यातील गुमथळा ग्रामपंचायत च्या वतीने सीएसआर फंड व हल्दीराम कंपनी यांच्या संयुक्त विद्द्यमातून खरेदी करण्यात आलेल्या शव वाहिनीचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. सरपंच प्रणाली योगेश डाफ यांचे हस्ते शव वाहिनीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी हल्दीराम कंपनीचे सहाय्यक अधिकारी यश जैन, उपसरपंच सीमा चवरे, ग्रामपंचायतसदस्य योगेश डाफ, महेश काकडे, कोमल तट्टे,मनोहर आगलावे, आकाश डाफ, रेखा भोयर, मीना डाफ, पिंकी मोहोड, कविता डाफ, दर्शना बोरकर, ग्रामपंचायत अधिकारी सचिन खोडे,पोलीस पाटील प्रवीण निबुळकर, पूनम मालोदे ,रमेश विघे,शंकर डाफ, ज्ञानेश्वर वाघ, दीपक वाघ,रवींद्र लांडे चंद्रकांत निंबूळकर, सुभाष धूळसे,खुशाल डाफ, नरेश डाफ,पांडुरंग सावरकर, दिलीप मुळे,प्रशांत चोपडे, सुरेश रामटेके, सुनील डाफ पंकज राऊत, विक्की काशीमकर, लीलाधर डाफ, चंद्रशेखर डाफ आनंद पेटकर, वर्षा डाफ,मंगला पेठे सह ग्राम पंचायत कर्मचारी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## कोराडी येथे गुरुदेव सेवा मंडळ महिला समितीच्यावतीने क्रांतीज्योतीचे भव्य स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची आठवण व जनजागृती करण्याकरिता गुरुकंज आश्रमातून क्रांती दिनाच्या पर्वावर निघालेल्या क्रांतीज्योतीचे श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर कोराडी येथे महिला समितीच्यावतीने भव्य स्वागत करण्यात आले. कामठी तालुका महिला सेवाधिकारी सुनंदा टेकाडे यांच्या हस्ते पूजा, आरती करून क्रांतीज्योतीचे स्वागत करण्यात आले. यावेळी क्रांतीज्योती सह आलेले हभप पुंडलिकबाबू चौधरी यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व ग्रामगीता देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमात मार्गदर्शन करताना हभप पुंडलिक बाबू चौधरी म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे फार मोलाचे योगदान असून त्यांनी देश स्वातंत्र्याच्या योगदनात केलेल्या महान कार्याची विदर्भातील प्रत्येक नागरिकांना जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून मोझरी येथून क्रांतीज्योत काढण्यात आली असल्याचे सांगितले.

प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे आदर्श ठेवून समाज कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला जिल्हा सेवा अधिकारी कांचनमाला माकडे,भैय्यालाल माकडे ,सुषमा राखडे,चंदा माकडे,मंदा महल्ले,नंदा तूरक, अनिता भुते, स्नेहल भुते, यशोधरा नासरे, उज्वला हुकुम, सुनीता मानकर, करुना आस्टनकर, सुनिता आगासे,जया वाडीभस्मे, संगीता वानखेडे, राजश्री बरंगी, पुनम माळोदे, सुवर्णा नासरे, अनघा दिवे, शिला देशमुख,वनिता कोठेकर, छाया वंजारी, कांचन मिरासे, सुषमा तडस, वनिता नाटकर, संध्या मानकर सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कांचन मला माकडे यांनी केले व आभार प्रदर्शन भयालाल माकडे यांनी मानले.

## रशियात इंधन संकट

**मॉस्को :** भारत आणि रशियाची मैत्री अनेक दशकांपासून कायम आहे. रशिया हा आजही भारताचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार आहे. मात्र, आता परिस्थिती काहीशी वेगळी पाहायला मिळत आहे. भारत रशियाला पेट्रोलचा मोठा पुरवठा करणारा देश बनला आहे. युक्रेनकडून रशियाच्या तेल रिफायनरीज सातत्याने होत असलेल्या ड्रोन हल्ल्यांमुळे देशातील इंधन उत्पादनावर परिणाम झाला आहे. परिणामी रशियाला पेट्रोल आयात करण्याची वेळ आली आहे.

# भाडीपार प्राथमिक शाळेत शौचालय आहे, मात्र पाण्याविना विद्यार्थ्यांची गैरसोय

### नवीन टाकीऐवजी अंगणवाडीची जुनी टाकी बसविल्याचा नागरिकांचा आरोप, चिखलमय रस्त्यामुळेही हाल

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा -राजु फुंडे**

सालेकसा तालुक्यातील ग्रामपंचायत बोदलबोडी अंतर्गत येणाऱ्या भाडीपार गावातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांअभावी मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शाळेमध्ये सन २०२५-२६ मध्ये नवीन शौचालयाची निर्मिती करण्यात आली असली तरी, शौचालयासाठी आवश्यक असलेल्या पाण्याची योग्य व कायमस्वरूपी व्यवस्था अद्याप करण्यात आलेली नाही.

शाळेच्या परिसरात बोअरवेलची सुविधा आहे. मात्र, या बोअरवेलमधून गढूळ व अस्वच्छ पाणी येत असल्याने त्याचा वापर करणे शक्य होत नाही. तसेच उन्हाळ्याच्या दिवसांत या बोअरवेलमधून अत्यंत कमी प्रमाणात, केवळ दोन ते तीन बादल्या पाणी मिळत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

परिणामी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तसेच शाळेतील मध्यान्ह भोजन तयार करण्यासाठी लागणारे पाणी शाळेच्या बाजूला असलेल्या घरातून आणावे लागत आहे. शाळेत विद्यार्थ्यांसाठी संडास व







लघुशंकेची सुविधा उपलब्ध असली तरी पाण्याअभावी या सुविधेचा योग्य उपयोग होत नसल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

**नवीन टाकीऐवजी अंगणवाडीची जुनी टाकी?**

शाळेच्या बाजूलाच अंगणवाडी असून, नागरिकांच्या म्हणण्यानुसार शाळेच्या नवीन शौचालयाच्या कामासाठी नवीन पाण्याची टाकी बसविणे अपेक्षित होते. मात्र संबंधित ठेकेदाराने नवीन टाकी न बसविता बाजूच्या अंगणवाडीची जुनी टाकी काढून शाळेच्या शौचालयासाठी बसविल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नवीन बांधकामाच्या कामामध्ये नवीन टाकीची व्यवस्था करणे अपेक्षित असताना जुनी टाकी बसविण्यात आल्याने नागरिकांनी या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची चौकशी करावी आणि शाळेच्या शौचालयासाठी नवीन व योग्य क्षमतेची पाण्याची टाकी बसवावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

**चिखलमय रस्त्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल**

दरम्यान, भाडीपार गावातील रस्त्यांची अवस्थाही अत्यंत बिकट झाली आहे. पावसामुळे संपूर्ण रस्ता चिखलमय झाला असून दुचाकी वाहनचालक, शाळकरी विद्यार्थी तसेच गावातील नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले आहे.

विशेष म्हणजे, लहान शाळकरी मुलांना दररोज चिखलातून वाट काढत शाळेत जावे लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचल्याने दुचाकी घसरण्याची व अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष भेट देण्याची मागणी**

भाडीपार येथील नागरिकांनी आमदार, जिल्हा परिषद सदस्य तसेच तालुक्यातील संबंधित लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष गावात व प्राथमिक शाळेत भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी केली आहे.

शाळेतील पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवून विद्यार्थ्यांच्या संडास व लघुशंकेसाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नवीन टाकीच्या कामाबाबत चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. त्याचबरोबर भाडीपार गावातील अत्यंत खराब व चिखलमय रस्त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून रस्त्याची दुरुस्ती अथवा नवीन रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे, अशीही जोरदार मागणी होत आहे.

शाळा आहे, शौचालय आहे; मात्र पाणी नाही. रस्ता आहे; मात्र चिखलामुळे त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या आणि ग्रामस्थांच्या मूलभूत समस्यांकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी कधी लक्ष देणार? असा संतप्त सवाल भाडीपार येथील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

आता तरी संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन शाळेतील पाणीप्रश्न, नवीन टाकीची व्यवस्था आणि भाडीपार गावातील चिखलमय रस्त्याची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### सरपंच देवेंद्र पटले यांची प्रतिक्रिया

सदर प्रकरणाबाबत सरपंच देवेंद्र पटले यांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, शौचालयाच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार अपेक्षेपेक्षा अधिक काम करण्यात आले आहे. तसेच, अंगणवाडीची पाण्याची टाकी रिकामी पडून असल्याने तिचा तात्पुरता वापर शाळेतील शौचालयासाठी करण्यात आला आहे. दरम्यान, शाळेसाठी स्वतंत्र नवीन पाण्याची टाकी मागविण्याची ऑर्डर देण्यात आली असून, ऑर्डर केलेली नवीन टाकी प्राप्त होताच अंगणवाडीची टाकी तात्काळ परत तिच्या मूळ ठिकाणी बसविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रस्त्याच्या समस्येबाबत त्यांनी सांगितले की, पावसाळ्यापूर्वी रस्त्यावर मुरूम टाकण्यात आला होता. मात्र, यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल निर्माण झाला आहे. संबंधित रस्त्याच्या खडीकरणाच्या कामाला एमआरजीएस अंतर्गत लघुपाटबंधारे विभागाची मंजुरी मिळाली होती. मात्र, काही कारणास्तव सदर मंजूर काम रद्द करण्यात आले.

त्यामुळे आता हा रस्ता युक्तधारा योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आला असून, बी-४ रॅम-४ मधून आवश्यक ती कार्यवाही करून रस्त्याचे काम करण्यात येईल, अशी माहिती सरपंच देवेंद्र पटले यांनी दिली.

## जनजागृती सेवा संस्थेतर्फे "सिंधुरत्न महिला दशावतार कलाकारांचा" सत्कार सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, कणकवली गुरुनाथ तिरपणकर**

कोकणच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन करणाऱ्या दशावतार या लोककलेच्या माध्यमातून जनजागृती करणाऱ्या महिला दशावतार संस्था सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यरत आहेत, त्यातच कणकवली येथील सिंधुदुर्ग महिला दशावतार मंडळ अग्रेसर आहे.त्यांच्या कलेचा गौरव म्हणून यथोचित सन्मान जनजागृती सेवा संस्था, बदलापूर यांच्यावतीने कणकवली येथील "सिंधुरत्न महिला दशावतार "नाट्य मंडळाच्या स्त्री आणि पुरुष कलाकारांचा भव्य सत्कार सोहळा येथील भवानी सभागृह,



तेली आळी,ता.कणकवली येथे संम्पन्न झाला. सर्व प्रथम गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, संस्थेचे सल्लगार अरविंद सुर्वे, सिंधुरत्न महिला दशावतार मंडळाच्या अध्यक्षा व अभिनेत्री अक्षता कांबळी, लावण्यसिंधू लोककला व चित्रपट सहकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर उपरकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विठ्ठल गाड हे उपस्थित होते.

जनजागृती सेवा संस्था बदलापूर या संस्थेचे सामाजिक कार्य व विविध उत्सव, पत्रकारिता, शैक्षणिक उपक्रम, गरजूना वस्तू वाटप,अन्नदान, दिपावलीमध्ये फराळ वाटप, महिला दिन कार्यक्रम, ज्येष्ठ पत्रकारांचा व विविध वृत्तपत्र संपादकांचा सत्कार,शिक्षक दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजयंती असे अनेक उपक्रम गेली ५ वर्षे कोकणासह ६ जिल्हयामध्ये राबविण्यात येत असल्याची माहिती जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष श्री. गुरुनाथ तिरपणकर यांनी बोलताना दिली. ते म्हणाले, कोकणच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन करणाऱ्या "दशावतार" या लोककलेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यरत असलेल्या "सिंधुरत्न महिला दशावतार "कणकवलीच्या अध्यक्षा अक्षता कांबळी मंडळाचे येथील सर्व स्त्री व पुरुष कलाकार, वाद्यवृंद, मेकअपमन, दिग्ददर्शक, लेखक यांचा शाल, श्रीफळ, गौरवपत्र, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कणकवलीतील स्वयंभु संस्थेचे अध्यक्ष व जेष्ठ साहित्यिक डॉ. विठ्ठल गाड, लावण्यसिंधू लोककला व चित्रपट सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर उपरकर, जनजागृती सेवा संस्थेचे सल्लागार अरविंद सुर्वे, अनिल कांबळी, गंधाली तिरपणकर यांचा सुद्धा हृद्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून बोलताना चंद्रशेखर उपरकर यांनी सांगितले की, जाणता राजा या महानाट्यातील सहकलाकारांना घेऊन आम्ही "शिवाई पर्यटन व कला - क्रिडा व साहित्य एकादमी " या संस्थेची स्थापना केली आणि त्याचवेळी या सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये प्रथमच महिला दशावतारी नाट्य प्रयोग सुरु केले. त्यावेळीपासून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुरुषांच्या बरोबरीने विविध महिला मंडळे महिला दशावतार नाट्यप्रयोग सादर करू लागल्या ते लोकांनाही आवडू लागले याचा आम्हाला आनंद वाटतो. त्यानंतर दशावतारी कलाकार विनायक येरागी, सूर्यकांत गुरव, गोविंद लाड, गुरुनाथ मेस्त्री, दत्तात्रय मेस्त्री, गिरीश लिंग्रस, साक्षी आमडोस्कर, शिवानी विचारे, मयुरी सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# छत्र्यांवर फुलली बालमनाची रंगपाखरे!

### 'रंग पाखरांच्या, रंग छत्र्या' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद, बसोलीच्या ८० बालचित्रकारांनी छत्रीवर साकारले कल्पनांचे रंगविश्व

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पावसाळ्यात हातात असणारी छत्री म्हणजे केवळ पावसापासून बचाव करणारे साधन म्हणून ओळख असली तरी रविवारी सकाळी याच छत्र्यांनी बालमनातील कल्पनांना पंख दिले. कुठे रंगीत फुलपाखरे, कुठे निसर्गचित्रे, कुठे पक्षी, तर कुठे कल्पनाविश्वातील वास्तववादी रंगीबेरंगी चित्रे... अशा विविध रंगांनी छत्र्या अक्षरशः बोलू लागल्या. निमित्त होते 'रंग पाखरांच्या, रंगछत्र्या' या अभिनव बालचित्रकला कार्यशाळेचे.

बालचित्रकारचा बसोली ग्रुप आणि शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात ७ ते १५ वयोगटातील सुमारे ८० बालचित्रकारांनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

लक्ष्मीनगरातील शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाच्या परिसरात सकाळपासूनच बालकलाकारांची लगबग सुरू होती. हातात रंग, कुंचला आणि समोर छत्री घेतलेल्या या



चिमुकल्या कलाकारांनी आपल्या कल्पनाशक्तीला मुक्त वाट करून दिली.

छत्री झाली कॅनव्हास... आणि रंगांनी सांगितली बालमनाची गोष्ट!

नेहमी पावसात डोक्यावर दिसणाऱ्या छत्र्यांना या उपक्रमामुळे एक वेगळेच रूप प्राप्त झाले. साध्या छत्र्यांवर बालचित्रकारांनी रंगांची उधळण करत त्यांना आकर्षक कलाकृतींमध्ये रूपांतरित केले. प्रत्येक छत्रीवर उमटणारे रंग आणि चित्र वेगळी कथा सांगत होते. बालमनातील निरागसता, कल्पकता आणि सर्जनशीलता या कलाकृतींमधून ठळकपणे जाणवत होती.

पॅरिसच्या युनेस्कोच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'मी'पासून 'आपण'पर्यंतचा रंगीबेरंगी प्रवास या प्रकल्पांतर्गत बसोलीच्या बालचित्रकारांनी यापूर्वी सहा विविध सामूहिक प्रकल्प साकारले आहेत. 'रंग पाखरांच्या, रंगछत्र्या' हा या मालिकेतील अंतिम टप्पा ठरला. व्यक्तिगत कलागुणांना सामूहिक सर्जनशीलतेची जोड देत 'मी'पासून 'आम्ही 'पर्यंतचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शासकीय कला व अभिकल्प महाविद्याल्याचे अधिष्ठाता श्री विश्वनाथ साबळे यांनी सदर केलेल्या प्रात्यक्षिकाने कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले.

या उपक्रमाला ज्येष्ठ आणि युवा चित्रकारांची साथ चिमुकल्या कलाकारांच्या कल्पनांना योग्य दिशा मिळावी यासाठी बसोलीचे प्रमुख आणि ज्येष्ठ चित्रकार चंद्रकांत चन्ने यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरातील १५ ज्येष्ठ चित्रकार आणि २५ युवा मान्यवर चित्रकार सहभागी झाले होते. या सर्वांनी मान्यवर चित्रकारानी सर्वच बालचित्रकारांना मार्गदर्शन केले. स्वतः छत्र्यांवर रंगकाम करत या मान्यवर चित्रकारांनी बालकलाकारांचा उत्साह वाढविला. यात मिलिंद लिम्बेकर, विनोद चौहान, विकास जोशी, श्री. बाबर, अभिषेक चौरसिया, श्री. गफ्फार, पंकज इटकेलवार, प्रफुल्ल डेकाटे, अक्षय तिजारे, मुक्तानंद नवघरे, गणेश बोबडे, आशिष बोदाडे आदी मान्यवर चित्रकार सहभागी झाले होते.

या उपक्रमात नागपुरातील विविध शाळांमधील ८० पेक्षा अधिक बालचित्रकार सहभागी झाले. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ चित्रकलेचा उपक्रम न राहता विविध शाळांतील आणि वयोगटांतील मुलांना एकत्र आणणारा सर्जनशील उत्सव ठरला.

**रंगांच्या माध्यमातून 'FROM ME TO WE'चा संदेश**

आजच्या डिजिटल युगात मुलांच्या हातातील मोबाईलऐवजी त्यांच्या हातात रंग देत कल्पनाशक्तीला चालना देण्याचा सुंदर प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला. रंग, कला आणि सामूहिक सहभागाच्या माध्यमातून मुलांना एकमेकांच्या कलाकृतींचा आदर करण्याबरोबरच 'एकत्र येऊन काहीतरी सुंदर निर्माण करण्याचा' संदेश मिळाला. कार्यक्रमाच्या निमित्ताने पालक, चित्रकार आणि कला क्षेत्रातील मान्यवरांनी बालकलाकारांचे कौतुक केले. चिमुकल्या हातांनी रंगविलेल्या छत्र्यांमुळे चित्रकला महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसरात जणू रंगांची बरसातच झाली होती.

पावसाचे थेंब छत्रीवर पडत असतील; पण या दिवशी त्या छत्र्यांवर बालमनातील स्वप्ने, कल्पना आणि रंग बरसले. त्यामुळे 'रंग पाखरांचा, रंग छत्रा' हा उपक्रम बालसर्जनशीलतेचा अविस्मरणीय रंगोत्सव ठरला. शेवटी सहभागी बालचित्रकारांना बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात आली आणि सहभागी कलाकाराना भेटवस्तू देण्यात आली.